



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक ५५ * नांदेड * शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार

## राज्यसभेसाठी पार्थ पवार



**मुंबई (प्रतिनिधी)** –अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान राष्ट्रवादीकडून राज्यसभेसाठी पार्थ पवार यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे.

आज झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा केली आहे. तसेच सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष पुन्हा झेप घेईल, असा विश्वासही प्रफुल्ल पटेल यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ झालेल्या एका भीषण विमान अपघातात निधन झालं होतं. अजित पवार यांच्या निधनानंतर उदभवलेल्या कठीण परिस्थितीत सुनेत्रा पवार यांनी नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारत राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. मात्र अजितदादांच्या पश्चात राष्ट्रवादी अजित पवार गटाचं काय होणार, विलिनीकरणाची प्रक्रिया कशी राबवली जाणार याबाबत अनेक सवाल उपस्थित केले जात होते. अखेरीस आज झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी कार्यकारिणीच्या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा केली.

# चक्क भोंगा लावून सांगितली दहावीच्या परीक्षेची उत्तरे!

**किनवट (प्रतिनिधी)** – कॉपीमुक्त परीक्षेसाठी जिल्हा प्रशासन कठोर पावले उचलत असताना तालुक्यातील दहेली तांडा परीक्षा केंद्राजवळ एकाने चक्क भोंगा लावून 'एमसीक्यू' परीक्षेची उत्तरे सांगितली. याप्रकरणी त्या अज्ञातावर किनवट पोलिसांनी कारवाई केली आहे.

जिल्ह्यात बारावी व दहावीच्या परीक्षांना सुरुवात झाली आहे. किनवट तालुक्यातील दहेली तांडा येथील प्राथमिक आश्रम शाळेत दहावी व बारावीचे परीक्षा केंद्र आहे. दि. २३ फेब्रु. रोजी दहावीच्या पहिल्याच पेपरला सहायक जिल्हाधिकारी जेनिथ चंद्र दोन्तुला व त्यांच्या टीमने सदर केंद्राला भेट दिली. त्यावेळी केंद्रात कॉपी सुरु असल्याचे दिसले. त्यावरून तेथील गुट्टे या केंद्र संचालकांना जिल्हाधिकाऱ्यांच्या संदर्भाने शिक्षणाधिकाऱ्यांनी तातडीने निलंबनाची कारवाई केल्याचे सांगण्यात आले.कॉपी प्रकरणानंतर त्या केंद्रावर केंद्र संचालक म्हणून सुबोध थोरात यांची नियुक्ती करण्यात आली. या प्रकारानंतर बुधवार, दि. २५ रोजी या केंद्रावर बारावीचा जीवशास्त्र विषयाचा पेपर होता. विद्यार्थ्यांना कॉपी देण्यास अटकाव होत असल्याने काहींनी चक्क आश्रमशाळेच्या आवाराला लागून असलेल्या इमारतीवर चक्क भोंगा (लाऊडस्पीकर) लावून विद्यार्थ्यांना 'एमसीक्यू' प्रश्नांची उत्तरे सांगण्यास सुरुवात केली. या अफलातून प्रकाराबद्दल उपस्थित केंद्र संचालकांसह शिक्षक अवाक् झाले. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर भोंगा काढून टाकण्यात आला.

याप्रकरणी केंद्र संचालक सुबोध थोरात यांच्या फिर्यादीवरून सिंदखेड पोलिसांनी अज्ञात आरोपींवर महाराष्ट्र गैरप्रकार प्रतिबंध कायदा कलम (३) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# विसावा गार्डनच्या पैशावर मनपा कर्मचाऱ्याचा डल्ला

## उपमहापौर दीपकसिंह रावत यांनी रंगेहात पकडले





**नांदेड (प्रल्हाद कांबळे)**– महापालिकेच्या माता गुजरीजी विसावा उद्यानामध्ये येणाऱ्या नांदेडकरांकडून गेटपासच्या माध्यमातून मागील चार वर्षापासून पावत्यांमध्ये आणि ऑनलाईन पेमेंटच्या माध्यमातून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार संबंधित कर्मचाऱ्याने अधिकाऱ्यांच्या आशीर्वादामुळे केल्याचा धक्कादायक प्रकार खुद्द महापालिकेचे उपमहापौर दीपकसिंह रावत यांनी उघडकीस आणला आहे. स्वतः त्यांनी गेटपास देणाऱ्या कर्मचाऱ्याला रंगेहात पकडून गुरुवारी आपल्या केबिनमध्ये चांगलेच झापले. या कर्मचाऱ्यांच्या डोक्यावर कोण्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा हात आहे हे लवकरच शोधून काढू व त्याच्यावर कारवाई करण्यात येईल, असे उपमहापौर दीपकसिंह रावत यांनी 'गोदातीर समाचार'शी बोलताना सांगितले.

या प्रकारामुळे पुन्हा एकदा प्रशासकराज काळातील भ्रष्टाचार उघड झाला आहे. नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या माता गुजरीजी विसावा उद्यानामध्ये नांदेडच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, बच्चे कंपनी मोठ्या प्रमाणात दिवसभरात खेळण्या- बागडण्यासाठी येत असतात. उद्यानामध्ये प्रवेश देण्यासाठी प्रवेशद्वारावर भाडे आकारण्यात येते. या भाड्यापोटी एका व्यक्तीला दहा रुपये असे शुल्क असून दिवसभरात हजारो विद्यार्थी, महिला, बच्चे कंपनी तसेच ज्येष्ठ नागरिक आपला वेळ घालविण्यासाठी तिथे येतात. मात्र मागील चार वर्षापासून येथे मूळ पद रोड कारकून असलेल्या एका (पान ३ वर..)

# महापालिकेच्या शंभर दिवस कार्यक्रमाचे उद्घाटन

## मी नांदेडचा पालक –खा. अशोकराव चव्हाण



**नांदेड (प्रतिनिधी)** –महापालिकेवर पहिल्यांदाच भाजपची एक हाती सत्ता आल्याने महापालिकेचा व शहराचा कारभार सुधारावा, नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात, शहर स्वच्छ व सुंदर रहावे यासाठी नांदेड- वाघाळा शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाच्या धरतीवर १०० दिवसांचा कार्यक्रम आखला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना खासदार चव्हाण म्हणाले की, मी नांदेडचा पालक असल्याने शहरात कुठेही विकास कामात दुजाभाव करणार नाही. सापत्न वागणूक देणार नाही, असा विश्वास त्यांनी यावेळी बोलून दाखवला.

व्यासपीठावर महापौर कविता संतोष मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, शिवसेनेचे गटनेते संदीपसिंग गाडीवाले, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपाल सिंग संधू, वायकोस, गाढवे आदींची उपस्थिती होती.

सर्वप्रथम महानगरपालिकेच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमात करावयाची महत्त्वाची कामे महापौर कविता मुळे यांनी सांगितली. नांदेडच्या जनतेने जो विश्वास दाखवून आम्हाला विजयी केले, खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेवर महापौर म्हणून मला प्रथम बहुमान मिळाला, मी माझ्या काळात नक्कीच दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करून शहराला वेगळी दिशा देणार आहे. शहरातील मुख्य चौक सुशोभीकरण, स्मशानभूमी, महिला स्वच्छतागृह, नदी प्रदूषणमुक्त, वृक्षारोपण आणि विशेष म्हणजे आरोग्य सेवेवर या १०० दिवसांत विशेष भर राहणार आहे. महापालिकेचे हे पहिले पाऊल असून, येणाऱ्या काळात ज्या मूलभूत सुविधा, विकास कामे यात आम्ही मागे पडणार नाही. यासोबतच पर्यटन वाढ, नागरिकांच्या सुविधांची निर्मिती असे विविध कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत. त्यानंतर आयुक्त महेशकुमार डोईफोडे यांनी शंभर दिवसांच्या कार्यक्रमाची रूपरेषा स्क्रीनवर दाखवली. खा. अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मी माझ्या प्रशासनाकडून सर्व कामे जबाबदारीने करून घेणार. स्वच्छतेसोबतच सर्व विविध मूलभूत सुविधा त्यात पाणीपुरवठा, दिवाबत्ती, अतिक्रमण, वाहतूक, अनधिकृत बांधकाम आणि नदी प्रदूषणमुक्त हे महत्त्वाची कामे मार्गी लावणार आहे. शहरातील प्रायोगिक तत्त्वावर काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. तसेच कौठा भागात २४ तास पाणीपुरवठा करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असे महापौर मुळे यांनी सांगितले.

# जिल्हा परिषद अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य; कॅबिनेट बैठकीत शिक्कामोर्तब

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर तेथे स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या आधारावर पक्षांना हे स्वीकृत नगरसेवकपद मिळाले आहेत. त्यातच, नुकतेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकाही पार पडल्या असून, आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य असणार आहेत. राज्य मंत्रिमंडळात या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांची माहिती आहे. जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे.


राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार असल्याची माहिती आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्यसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. ग्रामीण राजकारणाच्या दृष्टीने सरकारचा हा महत्त्वाचा निर्णय आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी यापूर्वीच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती.





**नांदेड–** माजी खासदार व हृदयरोगतज्ज्ञ डॉ. व्यंकटेश काब्दे यांना सुधाकरराव डोईफोडे जीवनगौरव तर ज्येष्ठ पत्रकार संजीव कुळकर्णी यांना सुधाकरराव डोईफोडे राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याप्रसंगीच्या छायाचित्रात माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, माजी आमदार अमर राजूरकर, प्रा. शामल पत्की, शंतनू डोईफोडे आदी दिसत आहेत.




# देगाव नदीत मृतदेह तरंगताना आढळला; घातपात की अपघात?

## पोलिसांसमोर तपासाचे आव्हान

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील देगाव शिवारात गुरुवार, दि. २६ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास ४० ते ४५ वर्षीय अज्ञात व्यक्तीचा मृतदेह नदीपात्रात पाण्यावर तरंगताना आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पिंपळगाव म. ते कारखाना रोडवरील नदीपात्रात ही घटना उघडकीस आली असून, हा मृत्यू घातपात आहे की अपघात, याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत.

देगाव परिसरातील नदीपात्रात एक मृतदेह तरंगताना स्थानिक नागरिकांना दिसला. या घटनेची माहिती दिली. बारड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रेय मंठाळे, विजय गायकवाड, शिवराज वाडीकर, दत्ता देशमुख आणि पोलीस पाटील रेखा जाधव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाची दुर्गंधी सुटलेली असल्याने तो बाहेर काढताना पोलिसांना मोठी कसरत करावी लागली.

पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात रवाना केला आहे. अद्याप या व्यक्तीची ओळख पटलेली नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मयताचे वय ४० ते ४५ वर्षे असून, अंगात पिवळ्या रंगाचा (काळे ठिपके असलेल शर्ट व काळी पॅन्ट आहे. उंची अंदाजे ५ फूट आहे. या इसमाची अद्याप ओळख पटली नसून, कोणाच्या ओळखीचा असल्यास बारड पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील


# घुसखोरी : कारणे आणि उपाय

देशाच्या अंतर्गत सुरक्षेबाबत ठोस भूमिका मांडताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुवाहटीतील कार्यक्रमात एक महत्त्वपूर्ण घोषणा केली की, पाच वर्षांत देशातील घुसखोरांची केवळ मतदारयाद्यांतून नव्हे, तर देशातूनही हकालपट्टी केली जाईल. तसेच ३१ मार्चपर्यंत नक्षलवादाचा संपूर्ण नायनाट करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. आसाममधील पोलीस बटालियनच्या नव्या परिसराच्या कोनशिला अनावरणावेळी मांडलेले हे विधान केवळ निवडणूकपूर्व भाषण म्हणून न पाहता, देशाच्या दीर्घकालीन सुरक्षाव्यवस्थेच्या आराखड्याच्या दृष्टीने तपासणे आवश्यक आहे. नापास लोकांच्या घुसखोरीचा प्रश्न हा केवळ सीमावर्ती राज्यांचा नाही; तो राष्ट्रीय सुरक्षेचा, सामाजिक समतोलाचा आणि संसाधनांच्या न्याय्य वाटपाचा प्रश्न आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सुमारे सत्तर वर्षांत विविध कारणांनी जसे सीमासुरक्षेतील त्रुटी, राजकीय स्वार्थ, स्थानिक प्रशासनातील उदासीनता किंवा मतदार राजकारण, घुसखोरीचा प्रश्न वाढत गेला. काही ठिकाणी अतिक्रमणे झाली, मतदारयाद्यांमध्ये नावे समाविष्ट झाली, तर काही भागांत लोकसंख्यात्मक बदल जाणवू लागले. हा केवळ 'कोण आले' याचा मुद्दा नाही; तर 'ते कसे आले, कसे स्थिरावले आणि कोणाच्या दुर्लक्षामुळे ते शक्य झाले' हा मूलभूत प्रश्न आहे. आज जर सरकार पाच वर्षांत घुसखोरांना देशाबाहेर पाठवण्याचा निर्धार व्यक्त करत असेल, तर त्यासोबतच एक प्रामाणिक आत्मपरीक्षण आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतरच्या सत्तर वर्षाच्या दीर्घ काळात झालेली ही 'घाण', ती घुसखोरीच्या स्वरूपात असो, अतिक्रमणाच्या स्वरूपात असो किंवा मतदारराजकारणाच्या स्वरूपात, ती नेमकी कशा पद्धतीने साफ केली जाणार? केवळ घोषणा करून किंवा राजकीय आरोप-प्रत्यारोपांनी हा प्रश्न सुटणार नाही. प्रथम, घुसखोरांची अचूक ओळख पटविण्याची प्रक्रिया पारदर्शक, कायदेशीर आणि मानवी हक्कांच्या चौकटीत असली पाहिजे. कारण मानवी हक्काचा नियम फक्त भारतालाच लागू आहे, इतर देशांना नाही. निरपराध नागरिकांवर अन्याय होऊ नये, तसेच खरोखरच अवैधरीत्या राहणाऱ्यांवर कारवाई टाळली जाऊ नये, हा समतोल साधणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नागरिकत्व, दस्तऐवज, स्थानिक पडताळणी यांसाठी एकसंध आणि तंत्रज्ञानाधारित यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे, सीमासुरक्षा अभेद्य करणे. सीमावर्ती भागांत पायाभूत सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान, गुप्तचर यंत्रणा आणि स्थानिक समुदायांचा सहभाग वाढविल्याशिवाय पुन्हा 'त्यांची' तशीच घुसखोरी होणार नाही याची खात्री देता येणार नाही. अन्यथा आज हकालपट्टी केली, तरी उद्या नव्या मार्गाने तीच समस्या पुन्हा डोके वर काढेल. तिसरे म्हणजे, मतदारयादी आणि नागरिक नोंदणी प्रक्रियेतील शिस्त. राजकीय स्वार्थासाठी मतदारसंख्या वाढविण्याच्या मोहातून बाहेर पडल्याशिवाय हा प्रश्न कायमचा सुटणार नाही. कोणत्याही पक्षाने 'व्होट बँक' राजकारणाला खतपाणी घालू नये, ही लोकशाहीसाठी मूलभूत अट आहे. नक्षलवादाच्या संदर्भातही अशीच भूमिका आवश्यक आहे. ३१ मार्चपर्यंत नक्षलवादाचा नायनाट करण्याचा निर्धार स्वागतार्ह असला, तरी नक्षलवाद फक्त बंदुकीने संपत नाही; तो सामाजिक-आर्थिक विषमतेतून उगम पावतो. विकास, शिक्षण, रोजगार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना बळ देणे, या उपायांशिवाय केवळ सुरक्षा कारवाया अपुऱ्या ठरतात. जर नक्षलवादाचा कणा मोडला गेला, तर त्यामागील कारणांचीही चिकित्सा करणे तितकेच आवश्यक आहे. घुसखोरी आणि अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न हा राजकीय घोषणांपलीकडे जाऊन राष्ट्रीय धोरणाचा विषय आहे. स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकांत जर काही त्रुटी राहिल्या असतील, तर त्या दुरुस्त करण्यासाठी सर्वपक्षीय सहमती, पारदर्शकता आणि कायद्याचा समान वापर आवश्यक आहे. अन्यथा आजची मोहीम उद्याची राजकीय भूमिका ठरेल, पण दीर्घकालीन समाधान मिळणार नाही. अधार्मिक लोकांच्या 'घुसखोरांची हकालपट्टी' हा घोषवाक्यात्मक मुद्दा आहे; परंतु त्यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, देशाच्या सीमांचे, मतदारयाद्यांचे आणि अंतर्गत सुरक्षेचे व्यवस्थापन भविष्यात कसे करणार? पुन्हा तशीच घुसखोरी होऊ नये, प्रशासन पुन्हा निष्क्रिय होऊ नये आणि राजकारण पुन्हा मतांच्या मोहात पडू नये, यासाठी ठोस संस्थात्मक उपाययोजना आवश्यक आहेत. राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न हा पक्षीय राजकारणाचा विषय न बनता, लोकशाहीच्या बळकटीचा विषय ठरला पाहिजे. स्वातंत्र्याच्या सात दशकांत साचलेली घाण साफ करण्याचा निर्धार जितका महत्त्वाचा, तितकीच महत्त्वाची आहे ती पुन्हा साचू न देण्याची दूरदृष्टी. घोषणांपेक्षा कृती, आणि कृतीपेक्षा शाश्वत व्यवस्था, यावरच या मोहिमेचे यश अवलंबून असेल.

# मराठी भाषेचे संवर्धन होणे अत्यावश्यक

मराठी ही आपली मातृभाषा आहे. तसेच ती महाराष्ट्राची राज्यभाषाही आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस संपूर्ण १ महाराष्ट्रात राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्या शैलीदार लेखणीतून ज्यांनी मराठी भाषेला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले ते ज्येष्ठ साहित्यिक ज्ञानपीठ विजेते वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रजांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस. कुसुमाग्रजांना १९८७ साली ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. हा मराठी भाषेला मिळालेला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार होता. त्यामुळे त्यांचा जन्मदिवसच मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यास महाराष्ट्र शासनाने सुरवात केली. भारतातील २२ प्रमुख भाषांपैकी मराठी ही एक प्रमुख भाषा आहे. महाराष्ट्र आणि गोवा राज्याची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही पंधरावी तर देशातील तिसरी भाषा आहे. २००१ च्या लोकसंख्येनुसार मराठी बोलणाऱ्यांची एकूण लोकसंख्या दहा कोटींच्या पुढे आहे. मराठी भाषा ९ व्या शतकापासून प्रचलित आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृतपासून झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे. मराठी भाषेला गौरवपूर्ण इतिहास आहे. देशातीलच नव्हे तर जगातील प्रमुख भाषा म्हणून मराठीकडे पाहिले जाते. ज्ञानेश्वरांपासून कुसुमाग्रजांपर्यंत अनेकांनी मराठी भाषेला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.

माझी मराठीची बोलू कौतुके
परी अमृतातही पैजा जिंके
ऐसी अक्षरे रसिके....मेळवीन



अशा शब्दांत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी मराठीचा गौरव केला आहे. लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...अशा शब्दात कविश्रेष्ठ सुरेश भटांनी मराठीचा गौरव केला आहे. एक हजार वर्ष जुनी, पाच हजार बोली भाषेपासून तयार झालेली, अमृतातही पैज जिंकणारी या माय मराठी भाषेच्या जपणुकीसाठी आपण काय करतो याचा प्रत्येकाने विचार करायला हवा. आज हिंदी आणि इंग्रजी भाषांनी मराठी भाषेवर आक्रमण केले आहे. इंग्रजी व हिंदी भाषेच्या आक्रमणाने महाराष्ट्रातूनच मराठी भाषा हद्दपार होती की काय अशी शंका येऊ लागली आहे. अर्थात याला सर्वस्वी मराठी माणसेच जबाबदार आहेत. मराठी माणसांच्या मनातच मराठीला गौण स्थान आहे आणि इंग्रजी भाषेला प्रथम स्थान आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. इंग्रजीला ज्ञानभाषा म्हटले जाते म्हणून मराठीची उपेक्षा केली जात आहे. विशेषतः उच्चभ्रू मराठी कुटुंबात मराठीत बोलणे अप्रतिष्ठित समजले जाते तर इंग्रजी भाषेत बोलणे प्रतिष्ठेचे समजले जाते. मराठी ही मातृभाषा असूनही इंग्रजीतून बोलण्याचा अट्टाहास धरला जातो. मराठी माणसे एकमेकांशी बोलताना मराठीत बोलायला कचरतात. मराठीपेक्षा इंग्रजी आणि हिंदीतून बोलणे प्रतिष्ठेचे समजतात. मराठी माणसेच आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या शाळेत दाखल करण्याऐवजी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत भरमसाठ फी भरुन दाखल करीत आहे. इंग्रजी भाषेचे अवास्तव स्तोम माजवल्याने मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. मराठी साहित्य संमेलनाकडे मराठी माणसेच पाठ फिरवू लागल्याने मराठी पुस्तकांच्या विक्रीत घट होऊ लागली आहे. ग्रंथालयातील मराठी पुस्तके वर्षानुवर्षे जागेवरूनही हलतही नाही. महाराष्ट्रातच मराठी भाषेची उपेक्षा होऊ लागली आहे. मराठी भाषा जिवंत ठेवण्याचे काम मराठी, साहित्यिक व सरकारचे आहे असेच मराठी माणसाला वाटते. मराठी साहित्यिकांना, लेखकांना मराठी भाषेविषयी जन्मजात प्रेम आहेच. अभिमान आहे.

मराठी भाषा गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि आकर्षक होईल यासाठी ते आपल्या परीने प्रयत्न करीतही आहे. महाराष्ट्र सरकारही मराठी भाषा जिवंत रहावी यासाठी प्रयत्न करीत आहे. पण महाराष्ट्र सरकारचे हे प्रयत्न तोकडे आहेत असेच म्हणावे लागेल. मराठी भाषेवर इंग्रजी भाषेचे अतिक्रमण वाढत असताना ते रोखण्यासाठी सरकार ठोस प्रयत्न करीत असल्याचे दिसत नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना मागणी तसा पुरवठा या तत्वाने सरकार भराभर परवानगी देत आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना सढळ हाताने परवानगी देणारे सरकार नवीन मराठी शाळांना परवानगी देत नाही तसेच आहे त्या शाळांना अनुदान देताना हात आखडता घेते. सरकारी कार्यालयात मराठीचा वापर अनिवार्य असताना तिथेही मराठीची गळचेपी होते. अनेक सरकारी कार्यालयात आज देखील मराठीचा वापर नावापुरताच केला जातो. केंद्र सरकारच्या कार्यालयात तर मराठीचा वापर होतच नाही. सरकारी कार्यालयात मराठीचा वापर व्हावा असा आदेश असताना त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. मराठी भाषा जगवण्यासाठी, वाचवण्यासाठी राज्य सरकारने खंबीर धोरण आखायला हवे. केवळ परिपत्रक काढून उपयोग नाही तर त्याची प्रभावी अंमलबजावणी होते का याचाही शोध सरकारने घ्यावा. राज्य सरकारच्या व्यवहारात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी करणे, सरकारच्या दैनंदिन कामकाजात मराठीचा जास्तीतजास्त वापर करणे, मराठी शाळांना जी उतरती कळा लागली आहे त्यासंदर्भात ठोस निर्णय घेऊन मराठी भाषेला उर्जितावस्था मिळवून देण्याचा प्रयत्न राज्य सरकारने करावा. मराठी ही अभिजात भाषा आहे. अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष मराठी भाषा पूर्ण करते असे असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळत नाही. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारने दबाव आणावा. सर्व राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी पक्षभेद विसरुन मराठीसाठी एकत्र येऊन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी पंतप्रधान, राष्ट्रपतींची भेट घ्यावी. साहित्यिक, लेखक यांनीही यासाठी सामूहिक प्रयत्न करावेत. मराठी भाषा जगवण्यासाठी, वाचवण्यासाठी सरकारी तसेच सामाजिक पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. मराठी भाषेला सुगीचे दिवस आणण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. सर्वसामान्य मराठी माणसांपासून सरकारपर्यंत सर्वांनीच मराठीच्या उत्कर्षासाठी आत्मचिंतन करायला हवे.


**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो.९९२२५४६२९५


# ओळखलत का सर मला?

मराठी साहित्य क्षेत्रातील कवीचे कवी म्हणून ओळखले जाणारे कुसुमाग्रज यांचा आज २७ फेब्रुवारी जन्म दिन आहे. त्यांना जननी व जन्मभूमी ही स्वर्गापेक्षा महान वाटत होती. क्रांतिकारकांना त्यांनी मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातून एखादा नवीन कवी काव्य घेऊन घरी आला असेल तर ते वाचून पहात. कधी कोणाचा त्यांनी अपमान केला नाही. चार शब्द समजावून सांगून त्यांच्या मनात परिवर्तन करत असत. कधीही कोणाला वाईट वाटेल असे ते बोलले नाहीत. त्यांनी केलेल्या मराठी साहित्यातील कार्याचा आढावा आपण या लेखात करून घेऊ त्या निमित्ताने लिहिलेले दोन शब्द.



आधुनिक मराठी साहित्यातील कुसुमाग्रज हे एक समाजाभिमुख व प्रतिभावंत लेखक आहेत. त्यांच्या लेखणीतून त्यांनी समाजाकडून आपुलकी मिळवली. प्रत्येक व्यक्तीला वाटत असे की, ते आपलेच आहेत असे प्रत्येकाच्या मनात एक गोडवा उत्पन्न केला. समाजात जीवन जगताना एक चांगला व्यक्ती म्हणून ते नावारूपाला आले. तळागाळातील माणसापर्यंत त्यांचे विचार पोहोचले. आज भारतातील अनेक विद्यापीठात यांनी लेखन केलेल्या साहित्याचा अभ्यास सुरू आहे. जीवनदृष्टी व वाड्.मय दृष्टी यांची एकात्मता साक्षात निर्माण करणारा साहित्यिक, लेखक म्हणून समाजात त्यांचे स्थान उठून दिसते तर त्यांच्या साहित्याचा अभ्यास जवळजवळ प्रत्येक विद्यापीठात विद्यार्थ्यांनी ठेवलेला आहे. भगवद्गीता, संत तुकाराम महाराजांचे काव्य. कालिदासाचे मेघदूत आणि उमर खय्यामची रुबाईत फार मोठा संस्कार कुसुम ाग्रजांच्या कवी मनावर आहे. ससा जरी चपळ असला तरी शर्यत ही कासवानी जिंकली आहे. जिद्दी माणसे जिद्दी मिळवतात मग प्रसिद्धी आपोआप पाठीमागे चालत येते. असे ते म्हणतात, सामाजिक अन्याय व विषमता या विषयावर कुसुमाग्रजांनी त्यांच्या लेखणीतून कठोर टीका केली.

साहित्यिकांनी सामाजिक बांधिलकी मानली पाहिजे. केशवसुत व कुसुमाग्रज यांच्या सामाजिक विचारांची नाते परस्पर संबंध जुळणारे आहे. साहित्य निर्मिती ही त्यांची जीवननिष्ठा ठरली आहे. बोले तसे चाले। त्याची वंदावी पावले या उक्तीप्रमाणे कुसुमाग्रजांचे जीवन आणि साहित्य यांचे अद्वैत नाते आहे. कुसुमाग्रजांच्या नंदनवनात मानवतेला, करूणेला स्वातंत्र्याला आणि सामाजिक समानतेला अनन्य साधारण स्थान आहे.

कुसुमाग्रजांनी लिहिलेली कणा ही कविता आजही सर्वांना ताजी व मनाला आधार देणारी वाटते. युवकांना तर ती स्फुर्ती व प्रेरणा देणारी ठरली आहे. त्या विद्यार्थ्यांची झालेली हुबेहुब अवस्था या कवितेत रेखाटले आहे, त्यांची कविता म्हणजे मराठी भाषेचा दागिना आहे ते कवीचे कवी आहेत. म्हणून त्यांचा जन्म दिन २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा दिन म्हणून आज सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. १९८७ मध्ये लिहिलेल्या नटसम्राट नाटकाला साहित्यातील सर्वोच्च पुरस्कार ज्ञानपीठ देण्यात आला. मराठी भाषेला समृद्ध करणारे ते साहित्यिक आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक वीरांनी आपले बलिदान दिले. इंग्रजांनी त्यांना फसवावर लटकवले त्यांच्या बलिदानातून आपण स्वतंत्र झालो. म्हणून एका कवितेतून कुसुमाग्रज म्हणतात. तुम्ही जातीभेदाविरुद्ध कायदे केले आहेत. परंतु प्रत्यक्षपणे जातीभेद आहेतच. यासाठी तुम्ही तुमच्या मनातून जातीबद्दलचे विषमतेचे विष काढून टाका. तरुणाचे बळ हे खरे देशाचे बळ आहे. देशाचा विकास करण्याची जबाबदारी तरुणांची आहे. तरुणच देशाचा विकास करू शकतात. परंतु सध्याचा तरुण वर्ग करमणुकीच्या गटारगंगेत वाहून जातो आहे, आणि तरुण व्यसनामुळे वेडे झाले आहेत. तरुणांच्या हाती जोपर्यंत जिद्द. चिकाटी अपार मेहनत. अहोरात्र कष्ट करण्याची तयारी असल्यास तुमचे कार्य अतुलनीय होईल.

स्वालंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य ही यशाची चतु:सूत्री आहे. कधीही यशाची वाट पाहत बसू नका. प्रयत्न करत रहा. विश्वास ही सर्व यशाची सर्वात मोठी पुंजी आहे. यशाची पायरी चढताना पराभवाचे सामना करावा लागतो. प्रत्येक जण आयुष्याच्या शेवटपर्यंत विद्यार्थी असतो. नवनवीन ज्ञान आत्मसात करा. अशी संजीवनी कवी कुसुमाग्रज आपल्या विद्यार्थ्यांना अध्यापनातून देतात म्हणूनच ते आज सर्वांच्या हृदयात आहेत. ज्ञानपीठ विजेते असून देखील कधी त्यांना अहंकार दाखवलेला नाही. मोठ्या लोकापेक्षा साधी भोळी माणसं जास्त जवळची वाटायची, बारा बलुतेदार लोकांसोबत त्यांचे मैत्रीचे संबंध निर्माण केले होते. स्वतःचा अपमान झाला कोणी मुद्दाम हून केला ;तरी त्यांनी विरोध केला नाही अनेक साहित्यिक त्यामुळेच त्यांना तुकाराम म्हणून संबोधतात. त्यांनी अनेक कवी, लेखक साहित्यिक घडविले .पेपरला लेख पाठविल्यानंतर ते लिहीत असत, संपादक साहेब पसंत आला तरच छापावे असे रोखठोक बोलणारे कुसुमाग्रज होते. कधी त्यांनी कोणाचे काही फुकट घेतले नाही. नटसम्राट लिहून लोकांच्या घराघरात ते पोहोचले *कोणी घर? देता का घर?* हे वाक्य तर महाराष्ट्रातल्या अनेक व्यक्तीला तोंडपाठ झाले आहे. एके दिवशी कुसुमाग्रज विद्यार्थ्यांना म्हणाले, यशाचे शीतल चांदणे तुम्हाला हवे असेल तर प्रयत्नाचा चंद्र अखंड ठेवलाच पाहिजे, जीवनात तुम्हाला काही साध्य करायचं असेल तर दोन गोष्टीची आवश्यकता असते. एक ध्यास व दुसरा अभ्यास होय. स्वतःच्या मनगटावर विश्वास असणाऱ्याला दुसऱ्याच्या सामर्थ्याची भीती कधीच वाटली नाही. यशाची पायरी चढताना पराभवाचाही सामना करावा लागतो. पराभवाने माणूस कधीही संपत नाही प्रयत्न सोडतो तेव्हा तो संपतो. ज्ञान हे वाहत्या पाण्याच्या झऱ्यासारखे असते. म्हणून ते निर्मळ ठेवण्याचा सतत प्रयत्न करावा असे मार्गदर्शन ते समाजाला करतात. प्रखर शक्ती ही प्रोत्साहन देणारी व ध्येयापर्यंत नेणारी ठरते. अशा प्रकारची अमृतवाणी ते आपल्या विद्यार्थ्यांना देतात, त्यामुळे आजही त्यांच्या साहित्याचा अभ्यास सर्व विद्यापीठात केला जातो. आजही त्यांची 'कणा' ही कविता मराठी माणसाच्या मनात गुणगुणत असते,

ओळखलत का सर मला
पावसात आला कोणी,
कपडे होते कर्दमलेले,
केसांवरती पाणी
क्षणभर बसला, नंतर हसला
बोलला वरती पाहून
गंगामाई पाहुणी आली
गेली घरट्यात राहून'

या कवितेतून आज आपल्याला बरंच काही शिकायला मिळते. म्हणून मराठी भाषा साठी कुसुम ाग्रजांनी केलेला कार्य अजरामर आहे त्यासाठी सर्वांनी आपण मराठी भाषेची सेवा करावी. संवर्धन करावं ,मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी मराठी साहित्य वाचन करणे गरजेचे आहे. अखिल भारतीय साहित्य संमेलन दरवर्षी भरवले जातात. त्यातून मार्गदर्शन केलं जाते ते मराठी माणसाच्या घराघरापर्यंत पोहोचावेत, मराठी साहित्याकडे तरुणांने पाठ फिरू नये. बऱ्याच जणांना मराठी भाषा म्हटलं की हसू येते, कारण सध्या जीवन जगण्याची भाषा इंग्रजी झाली आहे. त्यामुळे काही प्रमाणात मराठी भाषेकडे दुर्लक्ष होत आहे. ते होता कामा नये असे मला वाटते, देशप्रेम, राष्ट्रप्रेम यांचे अनेक मोहक रूप तात्यासाहेबांनी कवितेच्या माध्यमातून मांडले, विपुल अशी साहित्य संपदा त्यांनी निर्माण केली. अनेक कथा, कादंबऱ्या, कविता लिहिल्या, नाटके, एकांकिका वेगवेगळे प्रबंध लिहून मराठी भाषा समृद्ध केली, अशा या महान साहित्यिकांचा मृत्यू १० मार्च १९९९ रोजी झाला, शरीराने ते स्वर्गवासी झाले तरी त्यांचे विचार सदैव प्रेरणादायी आहेत. त्यांच्या विचाराचा जागर करून आपण सर्वांनी मराठी भाषा समृद्ध करूया, तेव्हाच त्यांना अभिवादन केल्याचे सार्थक होईल.


**- प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष:
विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी
ता.मुखेड जि. नांदेड


# मायबोलीत बोलू या! चला, मराठीतच बोलू या!!



मराठी भाषा हजारो वर्षांच्या इतिहासाने समृद्ध आहे. ही भाषा केवळ संवादाचे साधन नाही, तर आपल्या संस्कृतीचे, ऐतिहासिक परंपरेचे आणि सृजनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे. 'माय मराठी' या संकल्पनेत तिचे शुद्ध, प्रमाण आणि अभिजात रूप जितके महत्त्वाचे आहे, तितकेच विविध उपभाषांनी वाढवलेले तिचे वैविध्यही महत्त्वाचे आहे.

मराठी ही उपभाषांनी समृद्ध झालेली भारतातील एक प्रमुख भाषा आहे.मातृभाषा आपले अस्तित्व असते.बोलीभाषा माणसाची अस्मिता असते. प्रत्येक बोलीत तिचा वेगळा रंग, वेगळी लय आणि वेगळे चैतन्य तसेच लोकजीवनाचे प्रतिबिंब सामावलेले आहे. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना जगातील एका अभिमानास्पद भाषेला आपण 'माय मराठी' म्हणतो, याचा आत्मीय अभिमान बाळगण्याचा हा दिवस आहे. हा दिवस प्रत्येक मराठी माणसाने व्यवहारात, शिक्षणात, प्रशासनात, माध्यमांमध्ये आणि दैनंदिन संभाषणात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याचा संकल्प करण्याचा आहे.

**मराठी भाषा गौरव दिन : २७ फेब्रुवारी**

वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी साहित्य आणि भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी केलेल्या कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

२१ जानेवारी २०१३ रोजी मराठी भाषा विभागाने अधिकृतपणे या दिनाची घोषणा केली. तसेच ३ ऑक्टोबर रोजी राज्यात 'अभिजात मराठी भाषा दिन' साजरा केला जातो. तर दरवर्षी दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतनिमित्त १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. राज्यभरात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम, वाचन उपक्रम आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या दोन्ही दिवसांत राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

मराठी भाषेचा गौरव करण्याबरोबरच तिच्या संवर्धनासाठी आणि विस्तारासाठी चिंतन करण्याची ही संधी असते. चला, यावर्षी मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीला समृद्ध करणाऱ्या उपभाषांचा वाटा समजून घेऊया.

**विविध उपभाषांचा समृद्ध वारसा**

महाराष्ट्रात विविध बोलीभाषांचा विपुल वापर आढळतो. नाथ, महानुभाव आणि वारकरी संत परंपरेतील संतांनी प्राचीन काळापासून विविध बोलींचा वापर करून मराठी भाषेला अधिक व्यापक केले. आपण सर्वांनी आपल्या बालपणी चिमणी आणि कावळ्याची गोष्ट ऐकली आहे...तुम्हाला माहिती आहे, श्री. चक्रधर स्वामींनी ही गोष्ट आठशे वर्षांपूर्वी रुसलेल्या एका मुलीला सांगितल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. कविश्रेष्ठ कालिदास, शूद्रक यांच्या शाकुंतल, मृच्छकटिक या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठी बोली भाषेत आहेत.

वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, मालवणी, कोल्हापुरी, मराठवाडी, नागपुरी, झाडीबोली, खानदेशी, गोंडी, बंजारा, कोलामी अशा असंख्य उपभाषा मराठीच्या समृद्ध परंपरेचा भाग आहेत. प्रत्येक उपभाषेला स्वतंत्र ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे. जशा अनेक उपनद्या मिळून नदी अधिक विशाल आणि समृद्ध होते, तशाच या उपभाषांनी मराठी भाषेला गोडवा, विस्तार आणि ऊर्जा दिली आहे.

उदाहरणार्थ, वऱ्हाडी ही अत्यंत प्रभावी उपभाषा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' मध्ये वऱ्हाडी भाषेचा प्रभावी वापर दिसतो. त्यांनी संपूर्ण गावगाडाच मराठीत मांडला आहे.तसेच संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनांमधूनही वऱ्हाडीचा सहज आणि प्रभावी उपयोग आढळतो.आचार्य प्र.के.अत्रे यांनी गाडगेबाबांच्या वऱ्हाडी संबोधनाचे जाहीर कौतुक केले आहे.

कोकणी व मालवणी बोली त्यांच्या खास गोडव्यासाठी ओळखल्या जातात, तर कोल्हापुरी बोली तिच्या रांगड्या ठसक्यासाठी प्रसिद्ध आहे. झाडीबोली आणि गोंडी भाषेच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन झाला आहे. झाडीबोलीतील नाटकांची परंपरा महाराष्ट्राला ज्ञात आहे. खानदेशी आणि अहिराणी भाषेचा गोडवा बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून प्रत्ययास येतो.

उपभाषांवर प्रादेशिक प्रभाव असतो. उदाहरणार्थ, कोकणी मराठीवर कन्नडचा प्रभाव जाणवतो. 'अक्का' हा मोठ्या बहिणीसाठी वापरला जाणारा गोड शब्द कन्नड-तेलुगू भाषांमधून मराठीत रूढ झाला आहे. वऱ्हाडीमध्ये, झाडीबोलीत हिंदीचे, तर अहिराणीमध्ये गुजरातीचे अनेक शब्द सहजपणे मिसळलेले दिसतात. खरे तर हीच भाषेची खरी ताकद आहेस्वीकारण्याची आणि समृद्ध होण्याची!

**मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास**

उपभाषांनी मराठीला अधिक व्यापक आणि अभिव्यक्तिपूर्ण बनवले आहे. राज्य शासनाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धक, अभ्यासक, संशोधक, लेखक आणि साहित्यिक यांचा सन्मान करण्याचे निर्देश दिले आहेत.

भाषाविषयक स्पर्धा, परिसंवाद, व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात. विविध शासकीय कार्यालयांमध्ये त्रिभाषा सूत्राचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जात आहे. मराठीचा प्रशासनिक, शैक्षणिक आणि सामाजिक वापर वाढवणे ही काळाची गरज आहे.

शासन प्रयत्नशील आहेच; परंतु सर्वसामान्यांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी विविध बोलीभाषांचा अभ्यास करून त्यांचा अभिमान बाळगला पाहिजे. भाषेचे संवर्धन हे केवळ धोरणातून नाही, तर व्यवहारातून होते.

**मराठीचा वापर वाढवू या!**

'उपभाषांनी समृद्ध झालेली माय मराठी' हा विचार मराठीच्या सर्वांगसुंदरतेची जाणीव करून देतो. भाषा ही आईसारखी असतेविशाल, सामावून घेणारी आणि ममत्वाने ओथंबलेली.

महाराष्ट्रात येणारा कोणताही व्यक्ती या भाषेचा गोडवा अनुभवतो आणि सोबत घेऊन जातो. 'तुम्हाला मराठी येते म्हणजे तुम्ही मराठी आहात' हा या भाषेचा उदात्त बाणा आहे. त्यामुळे आज मराठी भाषा गौरव दिनाला जागतिक स्तरावर मराठीचा सन्मान टिकवण्यासाठी आम्ही सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे यासाठी.. मराठी माध्यमातील शिक्षणाचा प्रसारमराठी शाळांचे अस्तित्व टिकवणे, आधुनिक माध्यमांवर मराठीत अभिव्यक्त होणे, दैनंदिन व्यवहारात मराठीचा जाणीवपूर्वक वापरही अत्यावश्यक पावले आहेत. दिवंगत कवीवर्य डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी मराठीच्या सामर्थ्याचे सुंदर वर्णन केले आहे.

मराठीची प्रतिभा,
ज्ञानेश्वरीत समावते
ग्रामगीता गाथाही,
मराठीतच मावते
लावणीतून मराठीचे,
सौंदर्य ओसंडते
शौर्य आणि औदार्य,
पोवाड्यातून सांडते
मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले
गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले
अमृताशी पैज जिंकते, मराठी बोली
आभाळाची उंची जिच्यात, समुद्राची

खोली साऱ्यांनी मराठी हुंकारावर डोलावे, मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलावे..! चला मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया, मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलूया..!


**-प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर
मो. ९७०२८५८७७७

उदयोन्मुख कवयित्री निलम कुलकर्णी नांदेडकर यांच्या 'आनंदी चांदणे' काव्यसंग्रहाचे थाटात प्रकाशन

# मनाच्या अव्यक्त वेदनांना शब्दांची ऊब हवी –ज्येष्ठ कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर




**नांदेड (प्रतिनिधी) –** शरीराच्या जखमा दिसतात, त्यावर मलमपट्टी करता येते; पण मनाच्या जखमा अदृश्य असतात. त्या जखमांना शब्दांचे स्पर्श हवे असतात. व्यक्त होणे म्हणजेच मनाचे उपचार, आणि त्या उपचारांसाठी काव्य हेच सर्वांत प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवयित्री तथा स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. वृषाली किन्हाळकर यांनी केले. स्त्रीच्या वेदना केवळ शारीरिक नसतात, त्या सामाजिक, मानसिक आणि आर्थिक स्तरावरही असतात, याकडे त्यांनी विशेष लक्ष वेधले.

नांदेड येथे आयोजित कवयित्री नीलम नांदेडकर यांच्या 'आनंदी चांदणे' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात डॉ. किन्हाळकर बोलत होत्या. कार्यक्रमास सुप्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ. दि. भा. जोशी, ज्येष्ठ रंगकर्मी तथा साहित्यिक, सेवानिवृत्त उपप्राचार्य डॉ. जीवन पिंपळवाडकर, तसेच साहित्यप्रेमींची उपस्थिती होती.

डॉ. वृषाली किन्हाळकर पुढे म्हणाल्या, 'मी स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून काम करताना अनेक महिलांच्या आयुष्याशी जवळून परिचित झाले. त्यांच्या वेदना केवळ प्रसूतीकक्षापुरत्या मर्यादित नसतात. त्या वेदना दारिद्र्याच्या, कौटुंबिक दबावाच्या, सामाजिक अन्यायाच्या आणि आर्थिक असुरक्षिततेच्या असतात. अनेक महिलांना स्वतःचा आवाज दाबून जगावे लागते. त्यांना रडायलाही मोकळीक नसते. अशा वेळी कविता त्यांच्या अंतर्मनाची सखी बनते. आनंदी चांदणे या काव्यसंग्रहातून कवयित्री नीलम नांदेडकर आतून व्यक्त झालेली दिसून येते.

त्यांनी नमूद केले की, मानसिक आरोग्याकडे समाज अजूनही उपेक्षेने पाहतो. 'स्त्रीच्या वेदनांकडे 'तिला सवयच असते' या दृष्टिकोनातून पाहिले जाते, ही मोठी शोकांतिका आहे. पण जेव्हा ती स्त्री लेखणी हातात घेते, तेव्हा तिच्या वेदना शब्दांत रूपांतरित होतात आणि ते शब्दच तिच्या मुक्तीचे दार उघडतात, असे त्या म्हणाल्या.

प्रास्ताविकात नीलम नांदेडकर म्हणाल्या, 'मी वयाच्या पंधराव्या वर्षापासून लिखाण करते आहे. आयुष्याने अनेक परीक्षा घेतल्या; पण मी वेदनांच्या राखेतून आनंदाचे चांदणे वेचले. कविता माझ्यासाठी आत्मसंवादाची साधना आहे. त्यांनी काव्यसंग्रहाच्या पाठराखणीबद्दल ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी यांचे आभार मानले. डॉ. दि. भा. जोशी यांनी मनोविकारांविषयी समाजातील संकोचावर भाष्य करताना सांगितले, 'मनातील जळमटे काढून टाकण्यासाठी धैर्य लागते. कृतज्ञता व्यक्त करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कविता ही मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी औषधासारखी आहे. डॉ. जीवन पिंपळवाडकर यांनी अभिव्यक्तीच्या विविधतेवर प्रकाश टाकत म्हटले, 'अभिव्यक्तीची चौकट ठरवता येत नाही. प्रत्येकाच्या शब्दांना स्वतःची लय, वेदना आणि आशा असते. त्या वैविध्यातच साहित्याची खरी ताकद आहे. निलम कुलकर्णी नांदेडकर यांच्या या आनंदी चांदणे कवितासंग्रहास सर्व विषयांना स्पर्श करुन हा कवितासंग्रह सर्वसमयोचित केला आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

# लोहाच्या मोंढा भागात आठवडी बाजाराच्या दुसऱ्याच दिवशी व्यापारी, नगराध्यक्ष व टीमची स्वच्छता मोहीम



**लोहा (प्रतिनिधी) –**लोहा शहरातील मोंढा परिसरात व्यापारी, नगराध्यक्ष शरद पवार, कृउबा संचालक केशवराव मुकदम, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार व सहकार्याने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या स्वच्छता मोहिमेंतर्गत मोंढा यार्डात तीन तास स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत तरुण व्यापाऱ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. पहिल्यांदाच या भागात स्वच्छतेसाठी व्यापारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवकांनी श्रमदान केले. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी निवडणूक काळात जे आश्वासन दिले त्यातील स्वच्छता मोहीम राबविल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

नगर परिषदेच्यावतीने शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त स्वच्छता अभियान राबविण्याचा निर्धार करण्यात आला होता. मंगळवारी आठवडी बाजार त्यानंतर दुसऱ्याच दिवशी बुधवारी नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, कृउबा संचालक माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार, गटनेते भास्कर पवार, नगरसेवक हरीभाऊ चव्हाण, पंकज परिहार, तुकाराम दाढेल, राजेश बोडके, कृउबा संचालक कंधारे, व्यापारी संतराम दमकोंडवार, दिलीप सावकार कटकमवार, सविनय कोटलवार, हनुमंत कटकमवार, बंडू कटकमवार, उल्हास बिडवई, धनंजय कोटलवार, सचिन मोटरवार, तरुण उद्योजक विकास कोटगिरे, कैलास बिडवई, अमोल मोटरवार, राहुल कोटलवार, गजानन कोंडावार, गजानन कटकमवार, राहुल बिडवई, स्वच्छता विभाग प्रमुख थेवरे, स्वच्छता निरीक्षक लता ढवळे, गोविंद काळे, नळगे, चांदू राजकौर यासह नागरिक, व्यापारी, नगर पालिका कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मोंढा यार्ड परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात नगराध्यक्ष शरद पवार व त्यांचे सहकारी यांनी या अभियानासाठी पुढाकार घेतला. संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त मोंढा यार्ड भागात स्वच्छता करून संत गाडगेबाबा यांना अभिवादन करण्यात आले.

स्वच्छ, सुंदर शहर आपले शहर ही भावना प्रत्येकाच्या ठायी उतरावी यासाठी स्वतः नगराध्यक्ष शरद पवार व टीमने हातात झाडू घेऊन स्वच्छतेसाठी पुढाकार घेतला.

## शहरात ५१ योगाच्या उपशाखा उघडण्याचा संकल्प -योगाचार्य सीताराम सोनटक्के

**नांदेड (प्रतिनिधी)–** आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून या तारखेपर्यंत नांदेड शहरात नित्य योग सेवा समिती अंतर्गत योगाच्या मोफत चालणाऱ्या ५१ उप शाखा उघडण्याचा दृढ संकल्प योगाचार्य नांदेड योग रत्नभूषण सीताराम सोनटक्के यांनी केला आहे.

पतंजली योगपीठ हरिद्वार अंतर्गत चालणाऱ्या योग अभ्यासाचा परिपाठ नांदेड येथे गेले अडीच वर्षापासून नित्ययोग सेवा समितीच्यामार्फत चालविला जात आहे. योगाचार्य सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सकाळी ५ ते ७ या वेळेत देवकृपा लॉन्स, पूर्णा रोड, छत्रपती चौक येथे नियमित वर्ग चालू असून ह्या योग समितीच्या स्नेहांकित कॉलनी, सिंचन नगर, राज पार्क मालेगाव रोड या ठिकाणी तीन उपशाखा चालू आहेत.

रोज योगाच्या माध्यमातून ४०० ते ५०० योग साधक नित्य नियमाने योग अभ्यास करतात. या योगाच्या माध्यमातून हजारो नागरिकांना दुर्धर व लहान-मोठे आजार यापासून मुक्ती मिळवून ॲलोपॅथी दवाखाने व औषधी यापासूनही मुक्ती मिळाली आहे.

येत्या २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून योगाचार्य सीताराम सोनटक्के यांनी २१ जूनपर्यंत नांदेड शहरात विविध ठिकाणी ५१ उपशाखा सुरू करण्याचा निर्धार केला आहे. हा निर्धार पूर्ण होण्यासाठी नित्ययोग सेवा समितीचे सर्व पदाधिकारी, योगशिक्षक, योगशिक्षिका व योग साधक हे प्रयत्नशील आहेत.

## मसापच्या वतीने आज नांदेडमध्ये कवितादिन

**नांदेड (प्रतिनिधी) –** मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगरच्या वतीने गुरुवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी नांदेडमध्ये विसावा पॅलेस येथे कुसुमाग्रज यांच्या जन्म दिवसानिमित्त कवितादिनाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी यांना कविवर्य कुसुमाग्रज काव्य पुरस्काराने आणि डॉ. योगिनी सातारकर पांडे यांना कवयित्री लीला धनपलवार विशेष काव्य पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

सायंकाळी साडेपाच वाजता आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यासाठी डॉ. अक्षय कुमार काळे, डॉ. नागनाथ पाटील, डॉ. पी. विठ्ठल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, दादा गोविंदराव गोरे, आसाराम लोमटे, रामचंद्र तिरुके, गणेश मोहिते, दीपक क्षीरसागर, रामचंद्र काळुंखे, हंसराज जाधव, देवीदास फुलारी, संजीव कुलकर्णी, हेमलता पाटील यांच्यासह नांदेड शाखेचे अध्यक्ष बालाजी इबितदार, दिगंबर कदम, श्रीनिवास मस्के, महेश मोरे, राम तरटे, व्यंकटेश चौधरी यांची उपस्थिती राहणार आहे.

# लोहा तालुक्यातील पारडी येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**लोहा (प्रतिनिधी) –**लोहा तालुक्यातील पारडी येथे दि. २३ फेब्रुवारी रोजी शिवजयंती विविध सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी पारडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच शिवजयंती साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त गावातून मिरवणूक मोठ्या जल्लोषात काढण्यात आली. यावेळी लोहा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष शरद पवार, युवा नेते डॉ. नवनाथ चव्हाण यांच्यासह विविध मान्यवरांनी उपस्थिती लावली.

याप्रसंगी सरपंच सुमनबाई डिकळे, गोविंद डिकळे, माजी सैनिक उद्धव डिकळे आदींच्या हस्ते दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष शरद पाटील पवार, सरपंच प्र. गोविंद डिकळे, माजी सरपंच प्र. संभाजी पवार, व्यंकटराव मोरवले, शिवराज पवार, ग्रामविकास अधिकारी अरूण चौधरी, सूर्यकांत गायकवाड, शालेय व्यवस्थापन समिती विठ्ठल डिकळे, बंडू पवार, पोलीस पाटील विनायक मटके, मोहन महाराज भारती आदींची उपस्थिती होती.

तद्नंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतांना शिवसेना उबाठाचे युवा नेते माजी पंचायत समिती सदस्य तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य डॉ. नवनाथ रोहिदास चव्हाण, सरपंच प्र. गोविंद डिकळे, व्यंकटराव मोरवले, माजी सैनिक उद्धव डिकळे, शिवराज पवार, संग्राम डिकळे, किशन महाराज भारती यांची उपस्थिती होती.

यावेळी नगराध्यक्ष शरद पवार यांनी मार्गदर्शन केले. नंतर रक्तदान शिबिरात प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. तद्नंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची ट्रॅक्टरमधून वाद्यांच्या गजरात, आकर्षक रोषणाई, फटाक्यांची आतिषबाजी करत शाळेतील मुलींचे लेझीम पथक, नृत्यगान, घोड्यावर स्वार राजमाता जिजाऊ वेशधारण करून मुलींनी



जयंती सोहळ्यात भाग घेतला. यावेळी विविध उपक्रम राबविले. अन्नदान करण्यात आले. तसेच रक्तदान शिबिरात प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

पारडी येथील शिवजयंती उत्सवा-निमित्त आयोजित रक्तदान शिबिराला भेट देताना शिवसेना उबाठाचे युवा नेते डॉ. नवनाथ चव्हाण, धुराजी पाटील नावंदे, सरपंच प्र.गोविंद डिकळे, माजी सरपंच दिगांबर डिकळे, व्यंकटराव मोरवले, ग्रामविकास अधिकारी अरूण चौधरी, पारडी येथील तंटामुक्तीचे अध्यक्ष माधवराव पाटील पवार, माजी सैनिक उद्धव डिकळे, बंडू उर्फ गणपती पवार, तिरूमला डिकळे, ऋषीकेश डिकळे, शरद डिकळे, काळेश्वर डिकळे उपस्थित होते.

रक्तदान शिबिराच्या वेळी नंदीग्राम ब्लड रक्तपेढीचे शिवदास कदम, करण, राजभोज, आदिती मुंडे, ममता कांबळे आदींनी परिश्रम घेतले.

# मुदखेड येथे संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची जयंती साजरी

**मुदखेड (प्रतिनिधी) –**संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची जयंती मुदखेड शहरात २४ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष प्रतिनिधी माधव पाटील कदम यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाचे नेते प्रवीण गायकवाड, पोलीस निरीक्षक धिरज चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. आर. कांबळे, नगरसेविका निकिता संजय सोनटक्के, पाणी पुरवठा सभापती शाम चंद्रे, नगरसेवक संजय आऊलवार, नगरसेवक प्रतिनिधी संजय सोनटक्के, प्रवीण गायकवाड, उपेंद्र देवदे, नितीन चौदंते, नईम अण्णा बागवान, माजी उपनगराध्यक्ष शंकर राठी, एकबाल कुरेशी, माजी नगरसेवक गंगाधर डांगे, कैलास गोडसे, प्रकाश बलफेवाड, उमाकांत घोंगडे, महादू चमकुरे, मुजीब पठाण, प्रभाकर पांचाळ, संदीप मोडवान, किशोर पाटील पारवेकर, राम अबादार, शिवानंद देवके, सुरेश शेट्टे, पत्रकार मनोज कमटे, हफीज कुरेशी, साहेबराव गगलवाड, जानिमीया, ज्ञानेश्वर गायकवाड यांची उपस्थिती होती. यावेळी सूत्रसंचालन संतोष सावंत यांनी केले.

# आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते तालुक्यातील पाच तलाठी सज्जाचे 'दृकश्राव्य' प्रणालीद्वारे उत्साहात उद्घाटन

**लोहा (प्रतिनिधी) –** लोहा तालुक्यातील पाच गावांच्या तलाठी सज्जाचे उद्घाटन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते दृश्यश्राव्य प्रणालीद्वारे करण्यात आले.

या तलाठी सज्जामुळे या भागातील नागरिकांची गैरसोय टळणार असून, तलाठी यांनी सज्जावर उपस्थित राहून ग्रामस्थांची कामे करावी, असे आवाहन आ. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

लोहा तालुक्यातील सावरगाव (नसरत.), देऊळगाव (माळ्याचे), धानोरा (मक्ता), रिसनगाव, दापशेड या पाच गावांच्या तलाठी सज्जा कार्यालयाचे उद्घाटन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते दृश्यश्राव्य प्रणालीद्वारे करण्यात आले. तहसीलदार विठ्ठल परळीकर, युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर




यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला.

लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार, माजी जि. प. सदस्य हंसराज पाटील बोरगावकर, बांधकाम विभागाचे अभियंता सोमवंशी, माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी उपसभापती रोहित पाटील, गटनेते भास्कर पाटील पवार, बाबाराव पाटील गवते, कारेगावचे सरपंच दुल्लेखा पठाण, रिसनगावचे सरपंच प्रकाश पाटील पवार, दापशेडचे सरपंच वीरभद्र राजरे, भारत पाटील कदम, धानोरचे माजी सरपंच मनोहर पाटील कदम, धानोरचे माजी सरपंच आनंद पाटील कदम, चांद शेख, खंडू माटोरे, बळीराम माटोरे, इमाम शेख, परमेश्वर भाऊ मुरकुटे, अभंग पाटील गाडेकर, नगरसेवक राजू बोडके, वैजनाथ पाटील पवार, माधव पाटील काकडे आदी उपस्थित होते.

लोहा तालुक्यात ज्या नव्याने तलाठी कार्यालय बांधण्यात आले त्या सज्जाच्या ठिकाणी तलाठी यांनी उपस्थित राहून लोकांची कामे करावीत, जेणेकरून त्यांचा लोह्याला येण्याचा वेळ व खर्च वाचेल शिवाय वेळेवर कामे होतील. उर्वरित तलाठी सज्जे इमारत बांधण्यात येईल असे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सांगितले.

पान १ वरून...

**विसावा गार्डनच्या पैशावर मनपा कर्मचाऱ्यांचा डल्ला**

कर्मचाऱ्याला प्रवेशद्वारावर गेट पास देण्याचे काम देण्यात आले आहे, परंतु हा कर्मचारी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना हाताशी धरून व वरिष्ठांच्या आशीर्वादामुळे पावती बुकमध्ये प्रचंड मोठा घोळ करत माया कमावली आहे. कमावलेल्या पैशातून काही वाटा तो आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही देत असल्याचे त्याने स्वतः उपमहापौर रावत यांच्याकडे बोलून दाखवले. तो वरिष्ठ अधिकारी कोण याचा लवकरच उलगडा होणार असल्याचे सांगण्यात आले. उपमहापौर रावत हे बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी रोजी स्वतः नांदेडकरांच्या तक्रारी मिळत असल्याने विसावा उद्यानामध्ये आले. त्यावेळी त्यांना हा धक्कादायक प्रकार लक्षात आला. ज्या नागरिकांकडे देण्यात आलेली गेट पास परत त्याच्याजवळच जाते, तीच पावती दुसऱ्या नागरिकांना देण्यात येते, एवढेच नाही तर त्या ठिकाणी ऑनलाइन पेमेंट (गुगल पे, फोन पे) जमा होते ते थेट संबंधित कर्मचाऱ्यांच्या अकाउंटमध्ये जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हा प्रकार मागील चार वर्षापासून सुरू असून लाखो रुपयांची माया रोड कारकून असलेल्या कर्मचाऱ्यांकडून व त्याच्या अधिनस्त कर्मचारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. रावत यांनी गुरुवारी या सर्व कर्मचाऱ्यांना महापालिकेत आपल्या केबिनमध्ये बोलावून चांगलेच सुनावले. या प्रकरणात अजून मोठे मासे कोण कोण अडकणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# जि.प.कें.प्रा. शाळा बाळापूर येथे बजाज फायनान्सतर्फे विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप



**नांदेड (प्रतिनिधी) –**जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, बाळापूर येथे विद्यार्थ्यांसाठी सामाजिक बांधिलकी जपत बजाज फायनान्सतर्फे गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून धर्माबाद येथील बजाज फायनान्सचे मॅनेजर गंगाधर तुकाराम सांगवे व सहाय्यक मॅनेजर रहेमान महबूब शेख, मुख्याध्यापक वारले, श्यामला पाटील, मंदाताई पाटील, वास्टर, कोटगीर, जोशी, वगदाळे, चिलकेवार व कांबळे या शिक्षकांची उपस्थिती होती. मान्यवर व शिक्षक वृंदांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तरांचे वितरण करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास करण्याचे व शाळेचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले.

शाळेचे मुख्याध्यापक माधवराव वारले यांनी बजाज फायनान्सचे आभार मानत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत होऊन त्यांच्या शिक्षणास चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राम विठ्ठलराव चिलकेवार यांनी केले तर राहुल मरीबा कांबळे यांनी आभार मानले.

# एसजीजीएस संस्थेत राज्यस्तरीय झेनिथ २०२६ क्रीडा महोत्सव संपन्न

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी येथे राज्यस्तरीय वार्षिक क्रीडा महोत्सव झेनिथ २०२६ दि. २०, २१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात क्रीडा स्पर्धा पार पडल्या.

संस्थेच्या क्रीडांगणावर आयोजित या क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रातील नांदेड, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, भंडारा, शेगाव, नागपूर, जळगाव, चंद्रपूर तसेच भोपाळ येथील विविध दहा अभियांत्रिकी महाविद्यालयांमधून एकूण ६८९ खेळाडू अधिकृत सहभागी होते. त्यामध्ये ५१३ मुलांचा व १७६ मुलींचा समावेश होता. राज्यभरातून आलेल्या संघांमुळे स्पर्धेला व्यापक स्वरूप प्राप्त होऊन चुरस निर्माण झाली.

झेनिथ अंतर्गत व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कबड्डी, क्रिकेट, फुटबॉल,खो-खो, पावरलिफ्टिंग, बुद्धीबळ, बॅडमिंटन, हँडबॉल इत्यादी क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले होते. तीन दिवस रंगलेल्या या स्पर्धांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत चुरशीचे सामने सादर केले. उद्घाटन समारंभासाठी आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू सिद्धार्थ देसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले की, महाविद्यालयीन स्तरावरील स्पर्धा खेळाडूंना मोठ्या क्रीडा प्रकारासाठी तयार करतात. जिद्द, शिस्त आणि सातत्य यांमुळेच खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करतात.

विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, एसजीजीएससारख्या संस्थेत राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन होणे ही अभिमानाची बाब आहे. उत्कृष्ट नियोजन व सुविधा यामुळे खेळाडूंना दर्जेदार अनुभव मिळतो.

संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य संत बाबा सुखविंदर सिंघजी यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले की, खेळामुळे व्यक्तिमत्त्व घडते. संघभावना, संयम आणि परिश्रम हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी आपल्या विस्तृत भाषणात सांगितले की, खेळ हे केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे. नेतृत्वगुण, आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि संघभावना यांचा विकास क्रीडेमुळेच होतो.





मैदानावर मिळणारे अनुभव विद्यार्थ्यांना आयुष्यातील प्रत्येक क्षेत्रात सक्षम बनवतात. तसेच त्यांनी नमूद केले की, संस्थेने शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रालाही समान प्राधान्य दिले आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा, दर्जेदार प्रशिक्षण आणि उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. त्यांनी पुढे जाहीर केले की, संस्थेच्या क्रीडांगणाची सुधारणा व आधुनिकीकरणाचे काम प्रगतिपथावर असून नव्या ट्रॅक, प्रेक्षकांसाठी बैठक व्यवस्था, प्रकाशयोजना व इतर आवश्यक सुविधा विकसित करण्यात येत आहेत. पुढील वर्षी अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील सर्वात मोठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा याच सुधारित आणि सुसज्ज मैदानावर आयोजित करण्याचा संस्थेचा मानस आहे. आपले विद्यार्थी केवळ विद्यापीठ स्तरावरच नव्हे तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली छाप उमटवित आहेत. त्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. संजय देठे यांनी स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल समन्वयक, संयोजक, स्वयंसेवक आणि सर्व सहभागी खेळाडूंचे अभिनंदन केले. झेनिथमुळे विद्यार्थ्यांमध्ये फिटनेस व क्रीडाभावना अधिक दृढ होते, असे त्यांनी नमूद केले.

झेनिथ समन्वयक डॉ. जीत पाटील यांनी सांगितले की, तीन दिवसांच्या या महोत्सवासाठी विद्यार्थी स्वयंसेवकांनी मोठ्या मेहनतीने काम केले. सर्व संघांच्या सहकार्यामुळे स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. सहसमन्वयक प्रा. तिलक जाधव, क्रीडा प्रभारी भास्कर कदम आणि विद्यार्थी समन्वयक सागर ऊभाळे, बालाजी कल्याणकर यांचेही विशेष योगदान लाभले.


# अंतर्मन



# स्वप्नात परीक्षेत नापास होणे, अंत्यसंस्कार, काळा नाग पाहणे शुभ की अशुभ...?

## स्वप्नशास्त्रात धक्कादायक खुलासा

**झोपेत पडलेल्या स्वप्नांना स्वप्नशास्त्रात विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते, की काही स्वप्ने विनाकारण पडत नाहीत, तर वास्तविक जीवनाशी संबंधित काही संकेत असतात. कधीकधी आपल्याला आपल्या स्वप्नांमध्ये अशा गोष्टी दिसतात ज्या भयावह असतात किंवा खऱ्या असू शकत नाहीत. स्वप्नशास्त्रात अशा स्वप्नांचा अर्थ देखील स्पष्ट केला आहे. स्वप्नात गंगा नदी आणि बांधली जात असलेली इमारत यासह काही गोष्टी पाहणे शुभ मानले जाते. हे जीवनात सकारात्मक बदलांचे संकेत देऊ शकतात. चला तर मग स्वप्नात कोणत्या गोष्टी पाहणे शुभ मानले जाते ते जाणून घेऊया...**







- स्वप्नात अंत्यसंस्कार पाहणे : कधी कधी आपल्याला असे स्वप्न पडते, ज्यामुळे आपण दचकून उठतो. ते म्हणजे अंत्ययात्रा पाहणे. स्वप्नशास्त्रानुसार, स्वप्नात



अंत्यसंस्कार पाहणे हे एक शुभ लक्षण असू शकते. याचा अर्थ असा की जर तुम्ही काही काळापासून आरोग्य समस्या अनुभवत असाल तर आता तुम्हाला आराम मिळू शकतो. हे स्वप्न जीवनात सुधारित आरोग्य आणि सकारात्मकतेचे लक्षण असू शकते.

- स्वप्नात इमारत पाहणे : जर तुम्हाला इमारत किंवा घर बांधले जात असल्याचे स्वप्न पडले असेल तर ते खूप शुभ मानले जाते. याचा अर्थ असा की व्यक्तीच्या जीवनात लवकरच सकारात्मक बदल येऊ शकतात. स्वप्नशास्त्रानुसार, स्वप्नात इमारत पाहणे हे प्रगतीचे लक्षण मानले जाते. याचा अर्थ असा होऊ शकतो की जर तुम्ही कोणतेही महत्त्वाचे काम करणार असाल तर त्याचे शुभ परिणाम मिळू शकतात. याव्यतिरिक्त, तुम्हाला आर्थिक फायदा देखील होऊ शकतो.
- परीक्षेत नापास होण्याचे स्वप्न पाहणे : शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थी अनेकदा त्यांच्या परीक्षेत नापास होण्याचे स्वप्न पाहतात. हे स्वप्न आपल्याला अनेकदा चिंताग्रस्त करते. तथापि, स्वप्नशास्त्रानुसार, परीक्षेत नापास होण्याचे स्वप्न चांगले असते. याचा अर्थ असा की तुम्हाला काही शुभ परिणाम मिळू शकतात किंवा तुम्ही जे काम करणार आहात त्यात चांगले परिणाम मिळू शकतात.
- काळ्या सापाचे स्वप्न पाहणे : स्वप्नशास्त्रानुसार, स्वप्नात काळा साप पाहणे हे देखील एक शुभ लक्षण आहे. याचा अर्थ असा की समाजात तुमचा आदर वाढू शकतो. तुम्हाला काही क्षेत्रात नफा मिळवण्याच्या संधी देखील मिळू शकतात. तथापि, योग्य निर्णय घेणे महत्वाचे आहे. कारण शास्त्रांमध्ये असे म्हटले आहे की एखाद्या व्यक्तीला जीवनात केलेल्या कृतींनुसार फळ मिळते.
- गंगेचे स्वप्न पाहणे : असे मानले जाते की स्वप्नात गंगा पाहणे किंवा त्यात स्नान करणे हे खूप शुभ चिन्ह आहे. स्वप्नशास्त्रानुसार, या प्रकारचे स्वप्न म्हणजे व्यक्तीच्या जीवनात सुख आणि समृद्धी टिकून राहते. शिवाय, जीवनात सकारात्मक बदल दिसू शकतात. हिंदू धर्मात गंगा नदीचे विशेष महत्त्व आहे. म्हणूनच स्वप्नात गंगा पाहणे अत्यंत शुभ मानले जाते.

## 5 फेंगशुई टिप्स

# घरातील नकारात्मक ऊर्जा करतील दूर...

**वास्तुशास्त्रात घराशी संबंधित प्रत्येक वस्तूची योग्य दिशा, स्थान आणि उपायांचे वर्णन केले आहे, जे घरात सकारात्मकता टिकवून ठेवण्यास मदत करते. त्याचप्रमाणे, काही फेंगशुई टिप्स आहेत ज्यांचे पालन केल्यास तुमच्या घरात आनंद, समृद्धी आणि शांती टिकून राहू शकते. जर तुम्हाला तुमच्या घरात वारंवार समस्या आणि अडथळे येत असतील, तर तुम्ही त्यावर मात करण्यासाठी फेंगशुई टिप्स वापरून पाहू शकता. असे केल्याने घरातील नकारात्मक ऊर्जा निघून जाते आणि सभोवतालचे वातावरण शुद्ध होते, ज्यामुळे सकारात्मक आणि आनंददायी वातावरण निर्माण होते. यामुळे घरातील वातावरण आनंदी आणि समृद्ध राहते आणि समृद्धी वाढते. तर, चला या ५ फेंगशुई टिप्स सविस्तरपणे पाहूया...**


- घरातील या जुन्या वस्तू फेकून द्या : जर तुमच्याकडे जुने कपडे असतील जे तुम्ही आता घालत नाही, तर तुम्ही ते फेकून द्यावे. घरात जुने आणि खराब झालेले घड्याळ ठेवणे देखील अशुभ मानले जाते. फेंगशुईनुसार, जुने कुलूप, बूट इत्यादी घराबाहेर फेकून द्यावेत. या वस्तू जास्त काळ घरात ठेवल्याने नशीब नष्ट होऊ शकते.
- शौचालयाशी संबंधित महत्त्वाच्या गोष्टी : फेंगशुईनुसार, तुमच्या घरातील शौचालयाशी संबंधित काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्याचा दरवाजा कधीही उघडा ठेवू नये. तसेच, शौचालयाची खिडकी बाहेरून उघडणारी असावी याची खात्री करा. या ठिकाणी काचेत मीठ भरून ठेवा. ते वेळोवेळी बदलायला विसरू नका. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा पसरण्यापासून रोखले जाते.
- तुटलेली काच वापरू नका : जर तुमच्या घरात तुटलेली काच असेल तर ती ताबडतोब काढून टाका. तुटलेल्या आरशात पाहणे शुभ नाही. घरात कचरा ठेवू नये याची काळजी घ्या. असे केल्याने आजूबाजूच्या परिसरात नकारात्मक ऊर्जा वाढते, ज्यामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात.
- या वस्तू उशाला नको : फेंगशुईनुसार, रात्रीच्या वेळी उशाला किंवा बेडखाली काहीही ठेवून कधीही झोपू नये. असे मानले जाते की याचा झोपेवर आणि एकाग्रतेवर नकारात्मक परिणाम होतो. तसेच, बेडजवळ घड्याळे, फोन, औषधे इत्यादी ठेवणे टाळावे. असे केल्याने नशीब आणि जीवनावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.



- नळांबाबत ही गोष्ट लक्षात ठेवा : घरातील कोणत्याही नळाला गळती येत असेल तर ती ताबडतोब दुरुस्त करावी. नळातून सतत टपकणे शुभ नाही असे मानले जाते आणि फेंगशुईमध्ये पाणी संपत्ती मानले जाते. त्यामुळे संपत्तीचे नुकसान होऊ शकते. या फेंगशुई टिप्सचे पालन केल्याने घरातून नकारात्मकता दूर राहण्यास आणि आनंद, समृद्धी आणि शांती वाढण्यास मदत होते.

# चाणक्य म्हणाले की 3 लोकांपासून दूर राहणे चांगले, कधीही विश्वास ठेवू नका...

**आचार्य चाणक्य हे सर्वात बुद्धिमान आणि महान राजकारण्यांपैकी एक मानले जातात. त्यांनी घालून दिलेली तत्वे आजही तितकीच प्रासंगिक आहेत, जितकी ती शतकांपूर्वी होती. आचार्यांनी दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करून तुम्ही जीवनात येणाऱ्या समस्या टाळू शकता. आचार्यांनी त्यांच्या नीतिमध्ये अशा लोकांचा उल्लेख केला आहे ज्यांच्यापासून दूर राहणे चांगले. असे लोक कधीही तुमचा विश्वासघात करू शकतात. चला जाणून घेऊया जीवनात तुम्ही कोणावर विश्वास ठेवू नये...**



- चाणक्य नीती म्हणते, की तलवार किंवा इतर शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तीवरही विश्वास ठेवता येत नाही. अशी व्यक्ती छोट्या छोट्या गोष्टींवरून आक्रमक होऊ शकते, रागावू शकते. चंचल स्वभावाच्या महिलांवरही विश्वास ठेवू नये. त्या त्यांच्या धूर्ततेने तुमच्यासाठी प्रतिकूल परिस्थिती निर्माण करू शकतात. त्याचप्रमाणे, राजघराण्यातील नोकर आणि सदस्यांवर विश्वास ठेवणे योग्य नाही. ते राजाला प्रभावित करून घाबरवू शकतात.

नखीनां च नदीनां च श्रृंगीणां शस्त्रपाणिनाम्। विश्वासो नैव कर्तव्यो स्त्रीषु राजकुलेषु च ।। या श्लोकात चाणक्य अशा लोकांचा उल्लेख करतात ज्यांच्यावर तुम्ही अजिबात विश्वास ठेवू नये. आचार्यांचा असा विश्वास आहे की सिंह, बिबट्या आणि मोठ्या नद्या यांसारख्या लांब पंजे असलेल्या प्राण्यांना नेहमीच दूर ठेवले पाहिजे. मोठ्या शिंगे असलेल्या प्राण्यांना देखील टाळले पाहिजे. शिवाय, शस्त्रे बाळगणाऱ्या आणि राजाच्या जवळच्या लोकांवर अजिबात विश्वास ठेवू नये. त्यांनी महिलांपासून अंतर राखण्याचा सल्लाही दिला. आचार्य चाणक्य म्हणतात, की लांब पंजे असलेल्या भक्षक प्राण्यांपासून सावध राहिले पाहिजे. असे प्राणी तुमच्यावर कधी हल्ला करतील हे कधीच कळत नाही. त्याचप्रमाणे, कच्चे काठ असलेल्या नद्यांवरही विश्वास ठेवता येत नाही. या नद्यांचे प्रवाह कधी हिंसक होतील किंवा त्यांची दिशा कधी बदलेल हे कोणालाही माहिती नाही. म्हणून, या नद्यांजवळ राहणारे लोक सतत विनाशाला तोंड देत आहेत. मोठी शिंगे असलेले प्राणी देखील अविश्वासू असतात; त्यांचा राग कधी उफाळून येईल सांगता येत नाही.

# न्यायाची देवता शनिदेव अन् यमराज काळे कपडे का घालतात?


**या संपूर्ण विश्वात काळे कपडे घालणारे फक्त दोनच देव आहेत. दोघेही सूर्यपूत्र आहेत. एकाचे नाव शनिदेव आणि दुसऱ्याचे नाव यमराज आहे. देवाने त्यांना अंतिम न्यायाचे काम सोपवले आहे. शनिदेव सजीवांच्या सर्व कर्मांची परतफेड सुनिश्चित करतात, तर यमराज मृत्यूनंतर कर्मांची परतफेड करण्याची जबाबदारी घेतात.**

जर हे दोन्ही देव काळे कपडे घातले नसते आणि क्रूर नसतील तर न्याय अशक्य झाला असता. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीने क्रूर आणि निर्दयी कृत्ये केली असतात, त्याचप्रमाणे ते त्या कृत्यांसाठी प्रायश्चित्त करतात. या दोन देवतांच्या अनुषंगाने, न्यायाचे अंतिम प्रतीक असलेल्या, पृथ्वीवरील सर्व न्यायाधीश आणि वकील न्याय देण्यासाठी काळे कपडे घालतात. जर त्यांनी काळे कपडे घातले नसते तर न्याय अशक्य झाला असता. याचे आणखी एक कारण म्हणजे काळे कपडे इतर कोणताही रंग धारण करत नाहीत. ज्योतिषी कुंडलीत शनि अशुभ असताना काळा आणि निळा रंग टाळण्याचा सल्ला देतात. शनि अशुभ असताना काळे कपडे टाळणे आवश्यक आहे. ज्यांच्या कुंडलीत शनि बलवान असतो, जो योगकारक बनवतो, ते यशस्वी वकील आणि न्यायाधीश बनतात. शनिच्या बलामुळे, वकील आणि न्यायाधीश शतकानुशतके काळे कपडे घालत आले आहेत. आपल्या सर्वांना माहित आहे की, सूर्यप्रकाशात सर्व रंग असतातः लाल, निळा, हिरवा, पिवळा, इ. एखादी वस्तू लाल दिसते कारण ती लाल प्रकाश आपल्या डोळ्यांकडे परत परावर्तित करते आणि इतर रंग शोषून घेते. एखादी वस्तू निळी दिसते कारण ती निळा प्रकाश परावर्तित करते. तथापि, काळे कापड किंवा वस्तू सर्व प्रकाश शोषून घेते आणि कोणताही रंग परावर्तित करत नाही. जेव्हा कोणताही रंग प्रकाश आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचत नाही तेव्हा मेंदू त्याला काळा समजतो.

# ज्योतिषाची भविष्यवाणी कशी करते कार्य, कधी चुकतात भाकिते?

**ज्योतिषीय भविष्यवाणी आणि सल्ल्यातील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. ज्योतिषीय भविष्यवाणी असे म्हणते, की हे घडेल... तर ज्योतिषीय सल्ला असे म्हणतो की जर तुम्ही त्यानुसार वागलात तर हे घडू शकते... हा सूक्ष्म फरक ज्योतिषशास्त्र नशिबाचा शिक्का नाही तर शक्यतांची खिडकी आहे हे दर्शवितो.**

एक चांगला ज्योतिषीय सल्ला एखाद्या व्यक्तीला असा विचार करण्यास प्रेरित करतो की, 'जर मी खरोखर माझ्या कृती आणि निर्णयांची जबाबदारी घेतली तर मी माझ्या जीवनाचा मार्ग बदलू शकेन का?' जेव्हा एखादी व्यक्ती जाणीवपूर्वक निर्णय घेणारी बनते, तेव्हा ती कृती आणि निवडींद्वारे त्यांच्या जीवनाची दिशा ठरवू शकते. जेव्हा जेव्हा एखादा ज्योतिषी तुमच्या प्रगतीचे भाकीत करतो तेव्हा त्या यशासाठी व्यक्तीच्या कृती, क्षमता आणि योगदानाची आवश्यकता असते. जर एखादी व्यक्ती कृती करत नसेल तर शुभ भाकितावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. मात्र जीवनात अशुभ घटना नैसर्गिकरित्या घडतात.



कुंडली ही व्यक्तीच्या मनाचा नकाशा आणि काळाचे चिन्ह असते. बरेच लोक असे मानतात की ज्योतिषी जादुई दुर्बिणीसारखे असतात, भविष्य पाहू शकतात. परंतु सत्य हे आहे की ज्योतिषी तुमच्या कुंडलीतील चिन्हे वाचतात, जी शक्यता, प्रवृत्ती आणि काळाचे स्वरूप प्रकट करतात. कुंडली ही व्यक्तीच्या ग्रहांचा आणि काळाच्या स्वाक्षऱ्यांचा नकाशा असते, जी दर्शविते की त्यांच्या आयुष्यात कोणते दरवाजे उघडू शकतात आणि त्यांना कोणते अनुभव येण्याची शक्यता आहे. कोणता दरवाजा उघडायचा हा निर्णय वैयक्तिक आहे. जर तुम्हाला फक्त 'काय होणार आहे?' हे जाणून घ्यायचे असेल, तर तुम्ही केवळ परिस्थितीवर अवलंबून आहात. पण जर तुम्हाला 'मी काय करू शकतो?' हे जाणून घ्यायचे असेल, तर तुम्ही एक जागरूक प्राणी आहात आणि तिथेच ज्योतिषशास्त्र अर्थपूर्ण बनते. ज्योतिषी संकेत देऊ शकतो, शक्यता दाखवू शकतो आणि शुभ आणि अशुभ काळाच्या ट्रेंडबद्दल माहिती देऊ शकतो, परंतु व्यक्तीचे निर्णय त्यांचे नशीब ठरवतात. ज्योतिषशास्त्र एखाद्या व्यक्तीला यश मोजण्यासाठी स्वतःला बदलण्याची संधी देते, कारण ग्रह संकेत देतात; निर्णय त्यांचाच राहतो.

# होळी पूजा साहित्याची यादी...

**होळीचा सण म्हणजे वाईटावर चांगल्याचा विजय. होळीचा सण प्रामुख्याने दोन दिवस साजरा केला जातो. प्रथम होलिका दहन आणि नंतर दुसऱ्या दिवशी धूळवड, म्हणजेच रंगांनी होळी खेळली जाते. होलिका दहनाच्या दिवशी सकाळी होलिकाची पूजा केली जाते, त्यानंतर प्रदोष काळात संध्याकाळी होलिकेचे दहन केले जाते. शतकानुशतके, होलिका दहनाच्या अग्नीत अनेक प्रकारचे साहित्य टाकण्याची परंपरा आहे. पंचांग दिवाकरांच्या गणनेनुसार, यावेळी होलिका दहन २ मार्च रोजी केले जाईल. कृपया लक्षात घ्या की काही साहित्यांशिवाय होलिका दहनाची पूजा अपूर्ण मानली जाते.**

**होलिका पूजेसाठी संपूर्ण साहित्य :** नारळ, गुलाल, कुंकू, धूप, फुले, गोवऱ्यांचा हार, धान्य, मुगाची अखंड डाळ, लाल धागा, कलशात थोडेसे पाणी, नवीन धान्य (गव्हाची कणसे), सुपारी, तूप, मातीचा दिवा, मोहरीचे दाणे, लाल कापडाचा तुकडा, ऊस (प्रादेशिक परंपरेनुसार, काही लोक होलिका अग्नीत ऊस देखील टाकतात), कोणताही गोड पदार्थ. या सर्व वस्तू एका प्लेटमध्ये ठेवा आणि संपूर्ण कुटुंबासह होलिका पूजेसाठी जा. होलिका दहन दरम्यान गोवऱ्यांचा हार अर्पण करणे विशेष महत्त्वाचे मानले जाते. असे मानले जाते की माळेतील प्रत्येक गोवरी कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या नावाने अग्नीत ठेवली जाते. त्यामुळे ते त्यांच्यासाठी संरक्षक कवच म्हणून काम करते. धार्मिक मान्यतेनुसार, गोवऱ्याची माळ भक्त प्रल्हादाच्या रक्षणाचे आणि होलिकाच्या अहंकाराच्या दहनाचे प्रतीक आहे. होलिकेचा अग्नि खूप पवित्र मानला जातो. म्हणूनच जेव्हा होलिकेचे दहन केले जाते तेव्हा लोक तिच्याभोवती प्रदक्षिणा घालतात आणि कुटुंबात सुख आणि समृद्धीची प्रार्थना करतात. होलिकेची पूजा केल्यानंतर, घरातील वडीलधाऱ्यांचा आशीर्वाद घ्यावा. होलिकेला दहन करताना, तुमच्या घरातील लाकडाचा तुकडा किंवा काठी घ्या. ती काठी होलिकेत घाला आणि नंतर अग्नीला नमस्कार करा. कुटुंबातील सर्व सदस्यांनी होलिकेच्या राखेचा टिळा लावावा. असे केल्याने चांगले आरोग्य मिळते असे मानले जाते.

# 'स्मार्ट अंगणवाडी' योजनेत महाराष्ट्र देशात अग्रणी; राज्यात २४,७०० हून अधिक स्मार्ट किटचे वितरण

**मुंबई (प्रतिनिधी)** – 'स्मार्ट अंगणवाडी' ही अभिनव योजना राज्यात राबविण्यात येत असून या योजनेमध्ये महाराष्ट्र देशात अग्रणी ठरला आहे. आतापर्यंत राज्यातील २४,७०० हून अधिक अंगणवाड्यांना स्मार्ट किटचे वितरण करण्यात आले आहे, अशी माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य उमा खापरे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य प्रवीण दरेकर, सदाभाऊ खोत, चित्रा वाघ, प्रसाद लाड, राजेश राठोड, अमोल मिटकरी, ज. मो. अभ्यंकर यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, राज्यात आतापर्यंत २४,७०० हून अधिक अंगणवाड्यांना स्मार्ट किट देण्यात आले असून राज्यात एकूण १.१० लाखांपेक्षा जास्त अंगणवाड्या आहेत. दरवर्षी ५,००० अंगणवाड्यांना स्मार्ट किट देण्याचे उद्दिष्ट शासनाने निश्चित केले असून त्यासाठी सुमारे ९० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जातो. स्मार्ट किट देताना संबंधित अंगणवाडीची इमारत ही शासनाच्या स्वमालकीची असणे बंधनकारक आहे.

स्मार्ट किटसाठी तीन वर्षांच्या कालावधीसाठी टेंडर प्रक्रिया राबवली जाते. मात्र प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश दरवर्षी दिले जातात. शासनाच्या आर्थिक नियमांनुसार ही प्रक्रिया पार पाडली जाते, असे त्यांनी सांगितले.

पालघरमधील अंगणवाड्या हस्तांतरण प्रकरणे प्रलंबित असल्यास जिल्हाधिकाऱ्यांना ती प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश दिले जातील. नवीन अंगणवाड्यांसाठी जिल्हा नियोजनच्या ३% राखीव निधीतून प्राधान्याने तरतूद केली जाईल. टीएचआर (टेक होम रेशन) संदर्भातील सूचनांनुसार केंद्र शासनाकडे बदलांसाठी विनंती करण्यात आली आहे. लोकप्रतिनिधींच्या अभिप्रायानुसार सुधारित निकषांनुसार आहार पुरवला जाईल. नवीन शिक्षण धोरणानुसार शालेय शिक्षण विभागाशी समन्वय साधून अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे आरोग्य मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, कै. धर्मराज पुंडलिकराव सिंगेवार हे आमच्या जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, फत्तेजंगपूर, तालुका व जिल्हा नांदेड या संस्थेचे सभासद असून, नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या क्षेत्रातील संस्थेच्या मालकीची जमीन गट नंबर (३७/३८) मौजे फत्तेजंगपूर, ता. जि. नांदेड मध्ये संस्थेच्या लेआऊटप्रमाणे त्यांच्या मालकिचा व ताब्यातील प्लॉट नंबर (२०) वीस हा आहे. कै. धर्मराज पुंडलिकराव सिंगेवार यांचे दिनांक २२/१२/२००१ रोजी निधन झाले असून, सदरील प्लॉट नंबर (२०) वीस त्यांचे वारस शकुंतला धर्मराज सिंगेवार, विजय धर्मराज सिंगेवार, सुधीर धर्मराज सिंगेवार रा. जयप्रकाशनगर यांनी त्यांच्या नावावर हस्तांतरण कार्यवाही करून प्लॉट हस्तांतरण करून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह त्यांनी संस्थेकडे विनंती अर्ज दिलेला आहे.

तरी या सदरील प्लॉट हस्तांतरण कार्यवाहीस कोणाचा आक्षेप असल्यास (७) दिवसांच्या आत अध्यक्ष अथवा सचिव यांच्याकडे मूळ कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. ह्या कालावधीत आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे समजून वरीलप्रमाणे प्लॉटची हस्तांतरण कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अध्यक्ष सचिव

जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी
निर्माण संस्था मर्या. फत्तेजंगपुर, ता. जि. नांदेड

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

पत्ता :- वजीराबाद, नांदेड. ई-मेल पत्ता :- ळपषेपुालपरपवशव.ीस
दुरध्वनी :- (०२४६२) २३४४०४ फॅक्स क्र. :-(०२४६२) २३२०७१

## ई-निविदा सुचना

नांवाशमनपा/साबांवि/१८५१८/१८५१९/२०२६ दिनांक २५/०२/२००६

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे आर्थिक व तांत्रिक क्षमता असलेल्या कंत्राटदाराकडून व महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून वर नमूद निविदा सुचना निहाय कामाकरिता (मु.सो.सु.यो. व मनपा निधी)- सी.सी. रस्ता, सी.सी. नाली)) बी-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीनुसार ऑनलाईन निविदा मागवित आहेत. (निविदा कागदपत्र https://mahatender.gov.in या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास उक्त वेबसाईटवर व कार्यालयीन सुचना फलक याद्वारे कळविण्यात येईल.

आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड

## जाहीर प्रगटन

सदरील नामेची नोंद ७/१२ सदरी घेणे बाबत.

लिहून घेणार- सौ. सिंधुताई उत्तम बोडके रा. नागठाणा बु., ता. उमरी, जि. नांदेड
लिहून देणार -व्यंकटी बैमुतवाड यांचे वारस रा. उमरी, ता. उमरी, जि. नांदेड

कारणे संमतीपत्र लिहून देतो की, ता. उमरी येथील न.पा. हद्दीतील शेत सर्व्हे क्र. १६२/बी मधील प्लॉट क. ६५ चा भाग असुन न.पा. मा.क. ११७० आहे, जो प्रभाग क्रमांक ०९ मधील आहे. ज्याचे क्षेत्रफळ लांबी दक्षिण उत्तर ३० फुट व रूंदी, पुर्व-पश्चिम २० फुट एकूण क्षेत्र ६०० चौ. फुट म्हणजेच ५५.७६ चौ.मी. आहे. हा प्लॉट ज्याची चर्तुःसिमा पुढीलप्रमाणे आहे तो विकी केला आहे. पूर्वेस : रिकामा प्लॉट,पश्चिमेस : जाधव यांचे घर,दक्षिणेस : सदरील प्लॉटचा उर्वरित भाग,उत्तरेस : रस्ता

या चर्तुःसिमेच्या आतील ५५.७६ चौ.मी. जागा माझे वडिल व्यंकटी बैमुतवाड यांनी दिलीप रंगराव चंदनवार यांना कायमची विक्री केली आहे. तीच जागा/प्लॉट श्री. दिलीप रंगराव चंदनवार यांनी दस्त क्रमांक ७५९/२०१२ दिनांक ९/८/२०१२ आधारे श्री. विलास संपत्ती होनशेट्टे यांना विकी केली आहे. त्यानंतर तीच जागा/प्लॉट श्री. विलास संपत्ती होनशेट्टे यांनी दस्त क्रमांक ३३७/२०१६ दिनांक २९/०३/२०१६ आधारे श्रीमती सिंधुताई उत्तम बोडके यांना विकी केली आहे.

सदरील प्लॉट हा सर्व्हे नंबर १६२/बी मधील आहे. सदरील प्लॉट हा ७/१२ रेकॉर्डला मालकी रकान्यात लिहून घेणार श्रीमती सिंधुताई उत्तम बोडके यांच्या नावे करण्यात यावा यात आम्ही व्यंकटी बैमुतवाड चे वारस हरकत/आक्षेप घेणार नाही. सदरील विक्री केलेल्या ५५/७६ चौ.मी. जागेबाबत आम्हा वारसांच्या व नावेवाईकांच्या काहीही हितसंबंध राहणार नाही किंवा त्यांना हरकत/आक्षेप घेता येणार नाही. सदरील जागेवर कोणताही बोजा, गहाण, किंवा इतरांना विकी केलेली नाही. जर भविष्यात तसी निघाल्यास आम्ही स्वतः यास जबाबदार राह याची आम्हाला जाणीव आहे. सदरील प्लॉट बाबत आजरोजी कोणाताही न्यायालयात वाद चालु नाही. सदरील प्लॉट लिहून घेणार यांच्या ताब्यात असून ते त्यांच्या वंश परांगत उपभोग घेवू शकतात. त्याचा पुर्ण अधिकार त्यांना प्राप्त झाला आहे. सदरील प्लॉट बाबत आमचा कोणीही भाऊ, बिरादार अथवा वारस काही अडथळा निर्माण करतील तर त्यांची सर्व जबाबदारी आमच्यावर राहील. संबंधीत मालकाने या बाबत सादर केलेली कागदपत्रे वैधतेबाबत दिलेली संपुर्ण माहिती बरोबर असून ती भविष्यात चुकीची निघाल्यास संबंधीत घेण्यात येणारा फेरफार रद्द करण्यात यावा व त्यावर आधारीत निर्माण झालेल्या प्रत्येक वादास आम्हाला जबाबदार ठरविण्यात यावे व नियमाप्रमाणे होणाऱ्या कायदेशीर कारवाईस आम्ही जबाबदार राहील याची आम्हाला परिपुर्ण जाणीव आहे.

करिता हे संमतीपत्र मी माझ्या राजीखुशीने पंचासमक्ष पुर्ण विचाराणे व कोणत्याही दबावाला बळी न पडता लिहून दिले आहे ते मला व आमच्या सर्व वारसांना मान्य व बंधनकारक राहील. या बाबत कोणास आक्षेप असल्यास १५ पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरूपात आक्षेप नोंदवावे नंतर आलेले आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही,करीता हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

लिहून घेणार..
सौ.सिधुताई उत्तम बोडके
रा.नागठाणा ता.ऊमरी.जि.नांदेड

## Change In Name

My Old Name is MD SAMI UR RAHMAN MOHAMMAD IBRAHIM Now I am Changing as a new Name MOHAMMAD SAMI UR RAHMAN MOHAMMAD IBRAHIM Hence Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. ADDRESS- C/o MOHAMMAD IBRAHIM Shivaji Nagar Dharmabad Tq. Dharmabad, Dist. Nanded Maharashtra-4318009

## (जाहीर प्रगटन मार्फत तलाठी सज्जा कांडली)

विषय- मौ. कांडली येथील गट क्र. ३३५ मधील इतर अधिकारातील नमूद साधे कुळ पोतन्ना भोजन्ना स. कु. ५३-५४ (१०१७७), २ धाकटा मुलगा माधव सटवाजी (१०१७७ ) मुलगी महालनबाई भ. पिराजी (१०१७७) सा. कु. पोतन्ना भोजन्ना ५८ (१०१७७) १ वडील मुलगा मयत वारस (१०१७७) नातू दयानंद पि. लक्ष्मण (१०१७७) ही नोंद कमी करणे बाबत.

संदर्भ -अर्जदार श्री सयाजी जळबा कदम रा. कांडली ता. भोकर यांचा अर्ज दिनांक ०३/०२/२०२६.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रकाचे अनुषंगाने अर्जदार श्री सयाजी जळबा कदम रा. कांडली ता. भोकर यांनी मौ. कांडली येथील गट क्र. ३३५ मधील इतर अधिकारातील नमूद साधे कुळ पोतन्ना भोजन्ना स. कु. ५३- ५४ (१०१७७) २ धाकटा मुलगा माधव सटवाजी (१०१७७ ) मुलगी महालनबाई भ्र. पिराजी (१०१७७) सा. कु. पोतन्ना भोजन्ना ५८ (१०१७७) १ वडिल मुलगा मयत वारस (१०१७७) नातू दयानंद पि. लक्ष्मण (१०१७७) अशी ही नोंद कमी करणे बाबत या कार्यालयास विनंती अर्ज सादर केला आहे.

अर्जदार यांनी सादर केलेल्या ७/१२ चे अवलोकन केले असता मौ. कांडली येथील गट क्र. ३३५ मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ पोतन्ना भोजन्ना स.कु. ५३-५४ ( १०१७७) २ धाकटा मुलगा माध सटवाजी ( १०१७७ ) मुलगी महालनबाई भ्र. पिराजी (१०१७७) सा. कु. पोतन्ना भोजन्ना ५८ ( १०१७७) १ वडिल मुलगा मयत वारस (१०१७७) नातु दयानंद पि. लक्ष्मण ( १०१७७) अशी कुळाचे नोंद दिसुन येते.

करीता याव्दारे मौ. कांडली येथील गट क्र. ३३५ मधील इतर अधिकारातील नमुद साधे कुळ पोतन्ना भोजन्ना स.कु. ५३-५४ (१०१७७) २ धाकटा मुलगा माधव सटवाजी ( १०१७७ ) मुलगी महालनबाई भ्र. पिराजी (१०१७७) सा.कु. पोतन्ना भोजन्ना ५८ ( १०१७७) १ वडिल मुलगा मयत वारस ( १०१७७) नातु दयानंद पि. लक्ष्मण (१०१७७) कुळधारक अथवा त्यांचे वारसदार किंवा इतर कोणी हितसंबंधी व्यक्ती यांना कळविण्यात येते की, सदर कुळ कमी करणे बाबत कोणाचे काही आक्षेप असल्यास अथवा हरकत असल्यास त्यांनी आपले आक्षेप १५ दिवसांच्या आंत या कार्यालयास सादर करावेत. मुदतीनंतर येणा-या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन प्रकरणात नियमानुसार व गुणवत्तेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(विनोद गुंडमवार)
तहसिलदार, भोकर

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार मोतीराम कोंडीबा वागतकर रा. गवतवाडी ता. हदगांव जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार यांची मुळ शेत जमीन मौ. गवतवाडी ता. हदगांव जि. नांदेड येथील शेत गट क्रं. ०९ मधील क्षेत्रफळ ७ हे. ५५ आर पोटखराब १२ आर आकार रूपये १२.७५ पैशे पैकी अभयाबाई गंगाराम माने (मयत) हिचे नांवे असलेले १ हे. ९६ आर आकार रूपये ३.२९ पैशे, गंगाराम केरबा माने (मयत) यांच्या नांवे असलेले १ हे. ६७ आर आकार रूपये २.८१ पैशे, नारायण गंगाराम माने (मयत) यांच्या नांवे असलेले १ हे. ९६ आर आकार रूपये ३.२९ पैशे. नारायण गंगाराम माने (मयत) त्यांचे वारस १) बालाजी नारायण माने २) संगिता भ्र. रामा भिसे ३) आशाबाई भ्र. दिगांबर जायनुरे यांचे नांवे असलेले सामाईक क्षेत्र १ हे. ९६ आर आकार रूपये ३.२९ पैशे वरील सदरील जमीनीच्या एकत्रीत चर्तु:सिमा पुर्वेस : गायरान, पश्चिमेस : शिवाजी तुकाराम वागदकर यांचे शेत, दक्षिणेस : भिमराव विठ्ठल खोकले यांचे शेत आणि उत्तरेसः सुरेश बळीराम कदम यांचे शेत, हया चर्तु:सिमेच्या आतील संपुर्ण जमीन ही माझ्या पक्षकाराची वडीलोपार्जीत शेत मिळकत असुन पुर्वी माझे पक्षकार यांचे वडील कोंडीबा कानबा वागतकर यांच्या नांवे होती. माझे पक्षकार यांच्या वडीलांनी दिनांक २७-१२-१९६६ रोजी खरेदीखत कं. १५३९ प्रमाणे गंगाराम केरबा माने यांना विकी केलेली जमीन होती. सदर जमीनीचे मुळ मालक म्हणजेच कोंडीबा कानबा वागतकर हे आदिवासी समाजाचे होते व त्यांनी गंगाराम केरबा माने यांना जे की, धनगर समाजाचे होते त्यांना जमीन विक्री केली त्यामुळे

आदिवासी समाजाची शेत जमीन ही मुळ मालकास म्हणजेच माझे पक्षकार यांना परत मिळावी म्हणुन आदिवासी जमीन प्रत्यापित करणे कायदा अधिनियम १९७४ च्या कलम ४ प्रमाणे मा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्याकडे रितसर अर्ज दाखल केला होता त्या अर्जाचा निकाल दिनांक ३०-१२-२०२१ रोजी लागला असुन सदर जाहीर प्रगटनामध्ये नमुद केलेली संपुर्ण जमीन ही माझ्या पक्षकारास देणे बाबतचा आदेश करण्यात आलेला आहे व मा. तहसिलदार हदगांव यांनी महाराष्ट्र अनुसूचीत जमातींना जमीन प्रत्यार्पीत करण्यासाठी अधिनियम १९७४ मध्ये नमुद तरतुदी नुसार पुढील कार्यवाही करावी असा आदेश देण्यात आलेला आहे, त्यामुळे आज रोजी अभयावाई गंगाराम माने (मयत), गंगाराम केरबा माने (मयत) व नारायण गंगाराम माने (मयत). त्यांचे वारस १) बालाजी नारायण माने २) संगिता भ्र. रामा भिसे ३) आशाबाई भ्र. दिगांबर जायनुरे यांच्या नांवे असलेले सामाईक क्षेत्राबाबत कोणीही खरेदी विक्री संदर्भात कोणताही व्यवहार करू नये. सदर जमीनी बाबत खरेदी विक्रीचा व्यवहार झाल्यास तो झालेला व्यवहार बेकायदेशिर होईल त्यामुळे त्याच्या होणाऱ्या परिणामास आपण सर्वस्वी जवाबदार राहाल. करिता जाहीर प्रगटन.

मार्फत,
ॲड. आर. एस. डवरे,
हदगांव.

## जाहीर पत्रक

कार्यालय नगर पंचायत हिमायतनगर,
जि. नांदेड
जा. क्रमांक : २९५,
न. पं.-- दि. : २६/२/२०२६
प्रकरण- नाव परिवर्तन वार्ड. क्र. १५
मा.म.क्र. ७९१.

या जाहीर पत्रक प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, असमाबी उस्मान खान रा. हिमायतनगर मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केले आहे की घर/दुकान/प्लॉट नं. ७९१ वार्ड नं. १५ अब्दुल गुफरास अब्दुल हमीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदी पत्रक क्र. हिबानामा दिनांक : ३०/१२/२०२५ च्या आधारे विक्री घेतले आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्यांचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी पंधरा दिवसांच्या अवधीत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करणे, नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्व-रोड, पश्चिम :- प्लॉट क्र. ६५, दक्षिण-प्लॉट क्र. ६४, उत्तर -प्लॉट क्र. ६२.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

कार्यालय नगर पंचायत हिमायतनगर,
जि. नांदेड
जा. क्रमांक : ३००,
न. पं.-- दि. : २३/२/२०२६
प्रकरण- नाव परिवर्तन वार्ड. क्र. १९
मा.म.क्र. ३५०.

या जाहीर पत्रक प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख माजी शेख लाल रा. ब्रामणगाव मोहल्ला उमरखेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केले आहे की घर/दुकान/प्लॉट नं. ३५० वार्ड नं. १९ फेरोज खान युसूफ खान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदी पत्रक क्र. हिबानामा दिनांक : २३/२/२०२६ च्या आधारे विक्री घेतले आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्यांचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी पंधरा दिवसांच्या अवधीत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करणे, नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्व-मुख्तार खान यांचे घर पश्चिम :- रस्ता, दक्षिण-शेख पाशा यांचे घर, उत्तर -मुज्जमीलखान यांचे घर

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

कार्यालय नगर पंचायत हिमायतनगर,
जि. नांदेड
जा. क्रमांक : २९९,
न. पं.-- दि. : २३/२/२०२६
प्रकरण- नाव परिवर्तन वार्ड. क्र. ०७
मा.म.क्र. ४९६.

या जाहीर पत्रक प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मारोती उत्तम हनवते रा. हिमायतनगर मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केले आहे की घर/दुकान/प्लॉट नं. ४९६ वार्ड नं. ०७ शेख वहीद अस्लम शेख हमीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदी पत्रक क्र. २५८/२०२६ दिनांक : १३/२/२०२६ च्या आधारे विक्री घेतले आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्यांचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी पंधरा दिवसांच्या अवधीत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करणे, नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्व-प्लॉट क्र. ३१ पश्चिम :- प्लॉट क्र. २९, दक्षिण-प्लॉट क. ३३, उत्तर -रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

कार्यालय नगर पंचायत हिमायतनगर,
जि. नांदेड
फा. क्रमांक : २९८, जा.
क्रमांक:-
न.पं.-- दि. : १८/०२/२०२६
प्रकरण- नाव परिवर्तन वार्ड. क्र. १४
मा.म.क्र. ३८१

या जाहीर पत्रक प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख बाबा शेख हैदर रा. हिमायतनगर मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केले आहे की घर/दुकान/प्लॉट नं. ३८१ वार्ड नं. १४ बिस्मील्लाबी उमर खाँ यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदी पत्रक क्र. २४७/२०२६ दिनांक :१६/२/२०२६ च्या आधारे विक्री घेतले आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्यांचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी पंधरा दिवसांच्या अवधीत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करणे, नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्व-प्लॉट क्र. ५ पश्चिम :- प्लॉट क्र. ७ दक्षिण-रस्ता, उत्तर -शबीर खान यांची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर प्रगटन

तहसीलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.-/२०२५
श्री/श्रीमती-ज्ञानेश्वर परसराम नरवाडे
विरुध्द
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बितनाळ, ता. उमरी, जि. नांदेड
प्रकरण -जन्म/मृत्यू (जन्म) नोंद घेणे बाबत.

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे ज्ञानेश्वर परसराम नरवाडे रा. बितनाळ ता. उमरी, जि. नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/मृत्यू नोंदणी कायदा २०२३ व सुधारित शासन निर्णय दि. १२ मार्च २०२५ अन्वये दिनांक ३०/०९/२०२५ रोजी नोंद घेण्यासाठी इ. कि. फौ. अर्ज दि. / / रोजी दाखल केला आहे.

अर्जदार यांची मुलगा/मुलगी/स्वतः नामे कु. सिद्धी ज्ञानेश्वर नरवाडे यांचा जन्म दिनांक ०१/०९/२०२० रोजी झाल्याची नोंद मौ. बितनाळ, ता. उमरी, जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची/मृत्यूची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसांच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही. १५ दिवसांत आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

**तहसीलदार, उमरी**

## तहसील कार्यालय, हदगाव

### (जाहीर प्रगटन मार्फत तलाठी सज्जा दिग्रस)

विषय-मौ. खडकी (उजाड) ता. हदगाव येथील गट क्र. १५ क्षेत्रफळ १ हे. ०३ आर ७/१२ वरील नागोबा गोपाळा या संरक्षित कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत.

संदर्भ -श्री राजाभाऊ तुकाराम कवुटकर रा. तामसा ता. हदगाव यांचा अर्ज दि.३०.०५.२०२५

उपरोक्त विषयी संदर्भीय विनंती अर्जाचे श्री राजाभाऊ तुकाराम कवुटकर रा. तामसा, ता. हदगाव जि. नांदेड यांनी मौ. खडकी (उजाड) ता. हदगाव येथील गट क्र. १५ क्षेत्र १ हे. ०३ आर ७/१२ वरील नागोबा गोपाळा या संरक्षित कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत या कार्यालयास विनंती अर्ज सादर केला आहे.

अर्जदार यांनी सादर केलेल्या ७/१२ चे अवलोकन केले असता मौ. खडकी (उजाड) ता. हदगाव येथील गट क्र. १५ क्षेत्रफळ १ हे. ०३ आर ७/१२ वर नागोबा गोपाळा या संरक्षित कुळाची नोंद दिसून येते. करिता याद्वारे मौ.खडकी (उजाड) ता. हदगाव येथील गट क्र.१५ क्षेत्र १ हे. ०३ आर मधील इतर अधिकारातील नमूद संरक्षीत कुळ नागोबा गोपाळा (१०००९) कुळधारक अथवा त्यांचे वारसदार किंवा इतर कोणी हितसंबंधी व्यक्ती यांना कळविण्यात येते की, सदर कुळ कमी करणे बाबत कोणाचे काही आक्षेप असल्यास १५ दिवसांचे आत उक्त नोंदी संबधी तहसीलदार, हदगाव किंवा ग्राममहसूल अधिकारी, दिग्रस यांचे कार्यालयात व्यक्तीशः हजर राहून लेखी स्वरूपात पुराव्यासह हरकत नोंदविण्यात यावी. मुदतीत आक्षेप किंवा हरकत न मिळाल्यास नागोबा गोपाळा संरक्षित कुळाची नोंद कमी करण्यासाठी कुणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरून प्रकरणात नियमानुसार संरक्षित कुळाची नोंद कमी करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तहसीलदार, हदयाव

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.

### जाहिरात प्रगटन
### (नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री रविंद्र शामराव पवार यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (४५७), गट नं. (४५३), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (११) मालमत्ता नं. (एच-६०१), नवीन वार्ड क्र. (१०), नवीन मालमत्ता नं. (१७६१), साईज पूर्व-पश्चिम १२.१९ मीटर, दक्षिण-उत्तर-१५.२४ मीटर.

चर्तुः सिमा-
पूर्वेस : प्लॉट नं. १०, पश्चिमेस : प्लॉट क्र. १२, दक्षिणेस : गट नं. ४५३, उत्तरेस : ३० फुटाचा रस्ता.

अरविंदाबाई रविंद. पवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे/वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.

### जाहिरात प्रगटन
### (नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री गजानन किशनराव धरमुरे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (४८८), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०१) मालमत्ता नं. (ई-३७१), नवीन वार्ड क्र. (१०), नवीन मालमत्ता नं. (१५८०), साईज पूर्व-पश्चिम १०.३७ मीटर, दक्षिण-उत्तर-६.०९ मीटर.

चर्तुः सिमा-
पूर्वेस : खुली जागा, पश्चिमेस : प्लॉट क्र. १ चा भाग, दक्षिणेस : प्लॉट नं. २, उत्तरेस : प्लॉट नं. ३.

श्री विजय बालाजी दुदुलवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे/वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.

### जाहिरात प्रगटन
### (नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री गजानन किशनराव धरमुरे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (४८८), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (०३) मालमत्ता नं. (ई-३९३), नवीन वार्ड क्र. (१०), नवीन मालमत्ता नं. (१५८८), साईज पूर्व-पश्चिम २१.९४ मीटर, दक्षिण-उत्तर-९.१५ मीटर.

चर्तुः सिमा-
पूर्वेस : २५ फुट रस्ता, पश्चिमेस : खुली जागा, दक्षिणेस : प्लॉट नं. ४, उत्तरेस : प्लॉट नं. १ व २.

श्री विजय बालाजी दुदुलवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे/वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.

### जाहिरात प्रगटन
### (नांव परिवर्तन करणे बाबत)

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री राजाराम नागोराव लोकडे यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्वे नं. (....), गट नं. (४८४), जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. (....) मालमत्ता नं. (जी-१७०), नवीन वार्ड क्र. (१०), नवीन मालमत्ता नं. (२३९०), साईज पूर्व-पश्चिम ९.१४ मीटर, दक्षिण-उत्तर-१२.१९ मीटर.

चर्तुः सिमा-
पूर्वेस : १५ फुट रस्ता,
पश्चिमेस : प्लॉट नं. २२, दक्षिणेस : २० फुट रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. १६.

श्री प्रल्हाद चंपतराव कदम यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खताआधारे/वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नांव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा, अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत, असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंद वहित घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**


## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू. इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

-: संपर्क पत्ता :-
उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,
सिडको एम.आय.डी.सी. नांदेड
मो.नं. ९९६०१२८१९१

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## डॉ. शंकरराव चव्हाण यांना धनेगाव येथील समाधीस्थळी चव्हाण कुटुंबियांसह लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांनी केले अभिवादन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड तालुक्यातील वडगाव, धनेगाव येथे समाधी स्थळी जलनायक, भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री कै. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, माजी आमदार अमिता चव्हाण, आमदार ॲड. सुजया चव्हाण यांच्यासह चव्हाण कुटुंबीय व उपस्थित आमदार, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता वडगाव, धनेगाव ता. जि. नांदेड येथे समाधीस्थळी फुलांची सजावट करण्यात आली होती. प्रारंभी खासदार अशोकराव चव्हाण यांच्यासह माजी आमदार अमिता चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण, सुजाया चव्हाण व कुटुंबातील सदस्य यांनी समाधीवर विधीवत पूजन केले. या नंतर कै. शंकरराव चव्हाण व कै. कुसुमताई चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. यानंतर बिलोली, देगलूर विधानसभा मतदारसंघाचे आ. जितेश अंतापूरकर, माजी आमदार तथा भाजपा महानगर नांदेड शहराध्यक्ष अमर राजूरकर, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, शंकरराव चव्हाण कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, माजी चेअरमन गणपतराव तिडके, कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेडचे सभापती संजय लहानकर, वैजनाथ जाधव, डॉ. अंकुश देवसरकर, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका महापौर सौ. ज्योती संतोष मुळे, मनपा सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगाराणी अंबुलगेकर, माजी महापौर मंगला निमकर, सौ. शैलजा स्वामी, मुदखेड नगरपालिका माजी नगराध्यक्ष सुनील शेटे, भाजपा नगरसेवक विरेंद्रसिंघ गाडीवाले, सिडको नगरसेवक संजय पाटील घोगरे, राजू पाटील काळे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, सतीश बस्वदे, राजू लांडगे,माजी नगरसेवक बालाजी जाधव ,संजय इंगेवाड भालचंद्र पवळे,उमेश पवळे,माजी उपमहापौर सतीश



देशमुख,माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, भिमराव कल्याणे, विजय धोंडगे, बाळासाहेब देशमुख, रामसिंग चव्हाण, धनेगाव सरपंच पिंटू ऊर्फ गंगाधर पाटील शिंदे, डॉ. नरेश रायेवार, डॉ.अशोक कलंत्री, दलित मित्र माधवराव अंबटवार, दलित मित्र नारायण कोलंबीकर, डॉ. प्रा. रमेश वाघमारे, दतू देशमुख, राजू शेट्टे, उध्दवराव पवार, आनंदराव गायकवाड, अहातखॉन पठाण, ॲड. जे. पी. पाटील, मंगला धुळेकर, बालाजी पांडागळे, संतोष पांडागळे, डॉ. दाड, रमेश वाघमारे, माजी नगरसेविका सौ. ललिता शिंदे, पार्वती कोरडे, श्रीमती सुरेखा नेरलकर यांच्यासह जिल्ह्यातील भाजपा पक्षाचे पदाधिकारी व महिला पदाधिकारी, ज्येष्ठ कार्यकर्ते, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील पदाधिकारी व नागरिक, पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते.

## आ. हेमंत पाटील यांच्या संकल्पनेतून विज्ञानवारी परीक्षेचे आयोजन; विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**नांदेड/हिंगोली (प्रतिनिधी)** – राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद हिंगोली आणि हिंगोली एस्ट्रोनॉमिकल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि आमदार हेमंत पाटील यांच्या संकल्पनेतून राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त २३ फेब्रुवारी रोजी विज्ञानवारी पूर्वपरीक्षा घेण्यात आली. या परीक्षेला हिंगोली जिल्ह्यातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आणि २ हजारच्या वर विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.

शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी वाढावी आणि त्यांच्यामध्ये जागरूकता यावी या दृष्टिकोनातून आमदार हेमंत पाटील यांच्या संकल्पनेतून विज्ञानवारी पूर्वपरीक्षेचे आयोजन करण्यात आले



होते. या परीक्षेला हिंगोली जिल्ह्यातील सर्वच शाळांमधून जवळपास २ हजारच्या वर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजन केले होते. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाबद्दलची आवड वाढवणे, त्यांची बौद्धिक क्षमता विकसित करणे आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी त्यांना सक्षम करणे या उद्देशाने दरवर्षी आयोजन करण्यात येत असते. यामध्ये अभ्यासक्रमावर आधारित तसेच सामान्य विज्ञानाशी संबंधित प्रश्नांचा समावेश होता तर विद्यार्थ्यांच्या तर्कशक्ती, निरीक्षणशक्ती व विश्लेषण क्षमतेची चाचणी यामधून घेण्यात आली. या परीक्षेमधून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची आयुका (पुणे) येथे विज्ञानवारी शैक्षणिक सहल काढण्यात येणार आहे. यापूर्वी सुद्धा आ. हेमंत पाटील यांच्या पुढाकारातून परीक्षा आयोजित करण्यात आली होती व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना श्रीहरीकोटा येथे नेण्यात आले होते.

यावेळी सुद्धा पुणे येथे सहल आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी जिल्हा समन्वयक दत्ता पडोळे आणि त्यांच्या सर्व टीमने परिश्रम घेतले.

## एटीएम चोरांचा सुगावा लावण्यासाठी ६ पथकांमार्फत शोधमोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील चैतन्यनगर भागातील व भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या शिवमंदिर ते तरोडा बुद्रुक मुख्य रस्त्यावरील एसबीआय बँकेचे ६ लाख ७३ हजार रुपये असलेले एटीएम अज्ञात ३ ते ४ जणांनी पिकअप वाहनाद्वारे पळवून नेले होते. ही घटना २४ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वाजता घडली होती. एटीएम चोरांचा सुगावा लावण्यासाठी पोलिसांचे पथक वेगवेगळ्या दिशेने चोरट्यांचा माग काढण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

शहरातील चैतन्यनगर शिव मंदिर ते तरोडा बुद्रुक या मुख्य रस्त्यावर एसबीआय बँकेचे एटीएम आहे. २४ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वाजता अज्ञात ३ ते ४ चोरट्यांनी ते एटीएम उचलून पिकअप वाहनातून पळवून नेले. त्या एटीएममध्ये ६ लाख ७३ हजार रुपयांची कॅश होती. या घटनेची माहिती होताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंजने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी घटनास्थळी भेट दिली.

## घरफोडी करणारी आंतरराज्य टोळी जेरबंद; सव्वा किलो चांदीसह अडीच लाखांचा ऐवज जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहर आणि जिल्हाभरात घरफोडी करून पोलिसांची झोप उडवून देणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश करण्यात स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे यांच्या टीमला यश मिळाले. दोन चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून सव्वा किलो चांदीचे दागिने आणि सोने असा अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी ऑपरेशन फ्लश आऊट मोहीम राबविण्यात येत आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रमुखांना पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी सूचना केल्या आहेत. त्यानुसार उदय खंडेराय यांनी वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे कारवाई करण्यासाठी सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे व त्यांचे पथकातील फौजदार बळीराम दासरे, हवालदार माधव केंद्रे, गुंडेराव कर्ले, मिलिंद नरबाग, दिलीप चंचलवार, मोतीराम पवार आणि चालक सिद्धार्थ सोनसळे यांना आदेशीत केले होते.

त्या अनुषंगाने सपोनि रवी वाहुळे व त्यांच्या पथकाने माली गुन्ह्यातील आरोपींची माहिती काढत असताना त्यांना दि. २६ फेब्रुवारी रोजी गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, घरफोडी करणारे सराईत आरोपी आलुनगर भोकर येथे आहेत. वरिष्ठांच्या आदेशाने सदर ठिकाणी जाऊन सापळा लावून आरोपी सागरसिंग उधलसिंग टाक (वय ३८ वर्ष रा.हनुमान गल्ली उमरी), गजनसिंग ठाकुरसिंग बावरी (वय २१ वर्ष रा.उमरी) यांना ताब्यात घेवून गुन्ह्यासंबंधाने सखोल विचारपूस केली असता त्यांनी व त्यांचे इतर साथीदार यांनी पो.स्टे. विमानतळ हद्दीत गांधीनगर येथे ज्वेलर्स दुकान फोडून चांदीचे दागीने चोरी केल्याचे तसेच पो.स्टे. धर्माबाद हद्दीत घरफोडी केल्याचे सांगून गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन गुन्ह्यात चोरी गेलेला मुद्देमाल १ लाख ७५ हजार चांदीचे चैन पट्टी अंदाजे वजन ०१ किलो, ५४ हजार ४०८ रुपये चांदीचे दोन वाळे (कल्ले) वजन २०.४०० तोळे व काही सोन्याचे दागिने असा एकुण २ लाख ५० हजार,४०८ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## खंडोजी नरवाडे यांचे निधन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – नांदेड येथील वैशाली नगरमधील रहिवासी तथा किनवट आदिवासी विद्यालयातील सेवानिवृत्त सेवक खंडोजी संतुकराव नरवाडे यांचे गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

## करण येंड्रलवार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**किनवट (प्रतिनिधी)** – येथील नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांचे पुत्र तथा युवा नेते करण येंड्रलवार यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

येंड्रलवार यांच्या वाढदिवसानिमित्त नगर परिषद प्रशासकीय इमारतीसमोर सकाळी १० वाजेपासून रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. शिबिरात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रक्तदान हेच श्रेष्ठ दान या भावनेतून रुग्णांना जीवनदान देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात येणार आहे. रक्तदात्यांसाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा व व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. याच दिवशी सकाळी शहरातील अय्यप्पा स्वामी मंदिर येथे विशेष पूजा व आरतीचे आयोजन करण्यात आले आहे. विविध धर्मीय बांधवांच्या सहभागातून सामाजिक ऐक्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच साई नगर येथील बाल उद्यानात रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर रोजा पाळणाऱ्या मुस्लिम बांधवांसाठी सामूहिक इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती करण येंड्रलवार मित्रमंडळाने दिली आहे.

## गंगाराम भोंग यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – लोहा तालुक्यातील जांभरुण येथील ज्येष्ठ नागरिक गंगाराम भाऊराव पाटील भोंग यांचे गुरुवार, दि. २६ रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दिनांक २७ रोजी दुपारी दोन वाजता जांभरुण येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, चार भाऊ असा परिवार आहे.

## ह.भ.प. बळीराम भीमराव बांदरे देवापूरकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – स्व. शंकरराव चव्हाण यांचे विश्वासू सहकारी, परखड व निर्भीड व्यक्तिमत्व ह.भ.प. बळीराम भीमराव पाटील बांदरे देवापूरकर यांचे गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी निधन झाले. शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता त्यांच्या पार्थिवावर मुदखेड तालुक्यातील मौ.देवापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.







**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेलः godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com